# नागपूर दंगलप्रकरणी फईम खानला अटक



**नागपूर :** औरंगजेबाच्या कबरीवरून नागपुरात सोमवारी झालेली दगडफेक, जाळपोळ, हिंसाचारामागील सूत्रधार, मास्टरमाइंड हा एमडीपीचा (मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टी) शहर अध्यक्ष फईम शमीम खान (वय ३८) हा असल्याचे प्राथमिक तपासात पुढे आले आहे. गणेशपेठ पोलिसांनी त्याला अटक केली असून न्यायालयाने आरोपीला २१ मार्चपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. दरम्यान, या प्रकरणी आतापर्यंत ४६ जणांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी बुधवारीदेखील तीन ते चार लोकांना ताब्यात घेतले आहे. यापुढेही कारवाई सुरू राहणार असून दाखल सर्व गुन्ह्यांची बारकाईने तपासणी केली जाईल. सखोल तपासाअंती आम्ही सर्व बाबी उघड करू. यामागे कुठल्या शक्ती, संघटना आहेत त्याचाही तपास सुरू असल्याची माहिती पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल यांनी दिली.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १७ • अंक २४२

www.ramprahar.com

गुरुवार, २० मार्च २०२५ • पाने ८ • किंमत ₹२


## अंतरंग


कोकण रेल्वे महामंडळाच्या विलिनीकरणाचा मार्ग मोकळा/२

पनवेल मनपाकडून ३७० कोटींचा मालमत्ता कर वसूल/३

कबड्डीपटू प्रियांका शिंदेची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड/८


# एमपीएससीद्वारे पुढील काळात मोठी भरती

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

एमपीएससी अर्थात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पुढील काळात मोठ्या प्रमाणात भरती राबवली जाणार आहे. ती वेळेत व्हावी यासाठी सामान्य प्रशासन खात्यामधील सेवा विभागाच्या सचिवांनी इतर राज्यांच्या लोकसेवा आयोगाचा अभ्यास केला आहे. त्या अभ्यासानुसार आयोगाला नवे स्वरूप दिले जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि. १९) विधान परिषदेत केली. त्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

राज्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे अनियमित वेळापत्रक आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातील विद्यार्थी प्रशासकीय सेवेचे स्वप्न उराशी बाळगून स्पर्धा परीक्षांची तयारी करत असतात, मात्र लोकसेवा आयोगाच्या कारभारामुळे हजारो विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला सक्षम बनवावे, अशी मागणी राष्ट्रवादीचे आमदार शिवाजीराव गर्जे यांनी लक्षवेधीद्वारे विधान परिषेदत केली होती. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यूपीएससीच्या धर्तीवर एमपीएससीच्या परीक्षांचे कॅलेंडर तयार केले जाणार असल्याचे म्हटले.

एमपीएससीच्या वर्णनात्मक परीक्षा पद्धतीबाबतही या वेळी प्रश्न विचारण्यात आला. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, २०२३ साली आपण वर्णनात्मक परीक्षा पद्धत आणली होती, पण त्या वेळी विद्यार्थ्यांनी विनंती केल्यामुळे २०२५पर्यंत जुनीच पद्धत लागू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता, परंतु २०२५ पासून वर्णनात्मक पद्धतीने परीक्षा होतील. बहुसंख्य विद्यार्थ्यांचा वर्णनात्मक पद्धतीला पाठिंबा असून काही मोजके विद्यार्थी विरोध करीत आहेत, पण हा निर्णय घेणे गरजेचे आहे, कारण आपल्या विद्यार्थ्यांना यूपीएससीमध्ये नुकसान होते. एमपीएससी वर्णनात्मक पद्धतीत असेल तर राज्यातील विद्यार्थ्यांना यूपीएससीतही फायदा होईल.

एमपीएससीच्या परीक्षा खासगी संस्थांकडून न घेता आयोगाकडूनच घेण्यात याव्यात, अशीही मागणी करण्यात आली होती. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, **(पान २ वर..)**



### परीक्षांसाठी यूपीएससीप्रमाणे कॅलेंडर तयार करणार

एमपीएससी वेळापत्रकांसंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यूपीएससीमध्ये कधी परीक्षा होणार, कधी मुख्य परीक्षा आणि मुलाखत होणार याचे कॅलेंडर निश्चित असते, पण दुर्दैवाने आपल्याकडे कॅलेंडर तयार केल्यानंतरही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. २०१८-१९पासून राज्यात आरक्षणाचे वेगवेगळे निर्णय झालेले आहेत. ईडब्लूएस, एसईबीसीचा विषय पुढे येतो. वेगवेगळ्या न्यायालयाने दिलेल्या स्थगितीमुळे कधी कधी भरतीमध्ये अधिक वेळ लागतो, पण पुढच्या काळात यूपीएससीप्रमाणे एमपीएससीने कॅलेंडर तयार करण्यावर भर दिला जाईल.

# कुष्ठरोग निर्मूलनासाठी शासनाचा पुढाकार

## सेवाभावी संस्थांच्या अनुदानात वाढ करण्याचा प्रस्ताव सादर -मंत्री प्रकाश आबिटकर

## आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी केली होती मागणी

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यात कुष्ठरोग निर्मूलनासाठी उपाययोजना करण्यासंदर्भात आणि कुष्ठरूग्णांसाठी कार्य करणाऱ्या आनंदवन, तपोवन व इतर सेवाभावी संस्थांना देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे करून या महत्त्वपूर्ण विषयावर शासनाचे लक्ष वेधले होते. त्यानुसार उपाययोजनेसोबतच कुष्ठरुग्णांसाठी कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांना शासनाकडून सध्या दिल्या जाणाऱ्या अनुदानात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडून नियोजन व वित्त विभागाकडे सादर करण्यात आल्याची माहिती राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली आहे.

राज्यात राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी सन १९५५-५६मध्ये सुरू केली असली तरीही अद्यापही मोठ्या प्रमाणात कुष्ठरुग्ण आढळून येत असून एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत २० हजार कुष्ठरुग्ण आढळले आहेत. आरोग्य





विभागाच्या सर्वेक्षणानुसार कुष्ठरोग निमूर्लन करण्यात आलेल्या ठिकाणीही कुष्ठरोगाचा प्रसार होत असल्याचेदेखील निदर्शनास आले आहे. राज्यात कुष्ठरुग्णांसाठी कार्य करणाऱ्या आनंदवन, तपोवन व इतर सेवाभावी संस्थांना कुष्ठरोगाची देखभाल व औषधोपचार करण्यासाठी प्रती रुग्ण देण्यात येणारे अनुदान अत्यंत अल्प असून त्यामध्ये गत १२ वर्षात कोणतीही वाढ करण्यात आली नसल्याने संस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचेही जानेवारी २०२५मध्ये निदर्शनास आले. सर्वोच्च न्यायालयाने सन २०१४मध्ये कुष्ठरुग्णांच्या पुर्नवसनासाठी सर्वकष योजना (पॉलिसी) तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शासनावर दिली आहे, त्या अनुषंगाने या प्रकरणी शासनाने चौकशी करून कुष्ठरोगाचे पूर्णतः निर्मूलन करण्यासह कुष्ठरोग प्रसारावर आळा घालणे तसेच कुष्ठरुग्णांसाठी कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांना प्रती रुग्ण देण्यात येणारे अनुदान वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात दाखल केला होता.

या प्रश्नावर मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राज्यात एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत एकूण २०,००१ नवीन कुष्ठरुग्ण आढळले आहेत व त्या सर्वांना बहुविध औषधोपचाराखाली आणण्यात आले आहे. राज्यातील कोणत्याही भागात कुष्ठरोग निर्मूलन करण्यात आल्याचे अद्याप घोषित करण्यात आलेले नाही. कुष्ठरोगांसाठी कार्य करणाऱ्या आनंदवन, तपोवन व इतर सेवाभावी संस्थांना कुष्ठरुग्णांची देखभाल व औषधोपचार करण्यासाठी प्रती रुग्ण देण्यात येणारे अनुदान अत्यंत अल्प असून त्यामध्ये गत १२ वर्षात कोणतीही वाढ करण्यात आली नसल्याने संस्थाना अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची बाब अंशतः खरी आहे. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक कुनिका-२०११/प्र.क्र.३२१/आरोग्य-५, दिनांक २१ मार्च, २०१२ अन्वये राज्यात कुष्ठरुग्णांसाठी कार्य करणाऱ्या रुग्णालयीन तत्वावरील १३ स्वयंसेवी संस्थांना दरमहा प्रती कुष्ठरुग्ण २२०० रुपये आणि पुनर्वसन तत्वावरील १६ स्वयंसेवी संस्थांना दरमहा प्रती कुष्ठरुग्ण दोन हजार रुपये अनुदान शासनाकडून सध्या देण्यात येत असून राज्यात कुष्ठरोगावर आळा घालण्यासाठी राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यानुसार नवीन कुष्ठरुग्ण शोधून त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणून कुष्ठरोगाच्या प्रसाराची साखळी खंडित करण्यावर राज्यात भर देण्यात येत आहे. त्यानुसार राज्यात नियमित सर्वेक्षणासह अतिजोखमीच्या लोकसंख्येत कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) ही मोहीम सन २०२३पासून दरवर्षी राबविण्यात येत आहे तसेच यापूर्वी निदान झालेल्या कुष्ठरुग्णांच्या सहवासात असलेल्या व्यक्तींचीही कुष्ठरोगासाठी तपासणी करण्यात येत आहे. याशिवाय केंद्र शासनाकडील मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात दरवर्षी कुष्ठरुग्ण शोधमोहीमही राबविण्यात येत आहे. मागील वर्षामध्ये शुन्य कुष्ठरुग्ण असलेल्या गावांमधील सर्व जनतेची कुष्ठरोगासाठी तपासणी करण्यात येत आहे.

कुष्ठरोगाविषयी समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी दरवर्षी स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान राबविण्यात येते व यामध्ये २६ जानेवारी रोजी होणाऱ्या ग्रामसभेमध्ये कुष्ठरोगाविषयी शास्त्रीय माहिती देण्यात येते तसेच स्पर्श कुष्ठरोग जनजागृती पंधरवड्यादरम्यान जिल्हास्तरावर रॅली, शाळा व महाविद्यालयांमध्ये कुष्ठरोगविषयक निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धा, महिला मंडळ सभा, हस्तपत्रिका वाटप, मेगाफोनव्दारे प्रचार, आरोग्य पत्रिकेत लेख, पथनाट्य इ.चे आयोजन करण्यात येते. **(पान २ वर..)**

## निवडक

### मोमोज बनवणाऱ्या फॅक्टरीत कुत्र्याचे डोके अन् सडलेले चिकन

**मोहाली :** मोमोजप्रेमींना धक्का देणारी एक बातमी पंजाबमधून समोर आली आहे. मोहालीच्या मतौर येथील एका फॅक्टरीतील फ्रीजमध्ये कुत्र्याचे कापलेले डोके आणि इतर प्राण्यांचे मांस आढळून आले आहे. प्रशासनाने फॅक्टरीत छापा टाकला असता ५० किलो खराब चिकनदेखील आढळून आले आहे. या प्रकरणी फॅक्टरीच्या मालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### मोक्ष देण्याच्या बहाण्याने विदेशी महिलेवर अत्याचार

**तिरुवन्नामलाई :** मोक्ष मिळवून देण्याचे सांगत एका फ्रेंच महिलेला पर्यटक गाईडने दीपमलाई टेकडीवर नेऊन तिचे निर्जन गुहेत लैंगिक शोषण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पीडित ४६ वर्षीय महिला जानेवारीत तिरुवन्नामलाई जिल्ह्यात आली होती व ती एका आश्रमात राहत होती. लैंगिक अत्याचारादरम्यान पीडिता तेथून पळून जाण्यात यशस्वी ठरली. पोलिसांनी पर्यटक गाईड व्यंकटेशला अटक केली आहे.

# हिंजवडीत मिनीबसला आग; चार जणांचा होरपळून मृत्यू

**पुणे : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील हिंजवडी येथे बुधवारी (दि. १९) सकाळी धावत्या मिनीबसला आग लागल्याने चार जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर सहा जण गंभीर जखमी असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

होमा प्रिंटिंग प्रेसची टेम्पो ट्रॅव्हल्स मिनीबस बुधवारी (दि. १९) सकाळी ८च्या सुमारास तमन्ना सर्कलवरून रेजवानच्या दिशेने जात होती. अचानक बसला समोरून आग लागल्याने चालकाने गाडी बाजूला उभी केली. या वेळी चालक व बसमधील पुढील काहीजण सुखरूप बाहेर पडले, मात्र मागील दरवाजा वेळीच न उघडला गेल्याने चार जणांचा होरपळून जागीच मृत्यू झाला.



मृतांमध्ये सुभाष सुरेश भोसले (वय ४२, रा. वारजे), शंकर शिंदे (वय ५८, रा. नऱ्हे), गुरूदास लोकरे (वय ४०, रा. हनुमान नगर, कोथरूड), राजू चव्हाण (वय ४०, वडगाव धायरी) यांचा समावेश आहे, तर चालक जनार्दन हुंबर्डेकर (वय ५७, रा. वारजे), संदीप शिंदे (वय ३७, रा. नऱ्हे), विश्वनाथ जोरी (वय.५२, रा. कोथरूड), विश्वास खानविलकर (पुणे), प्रवीण निकम (वय ३८) आणि चंद्रकांत मलजी (वय ५२, रा. दोघेही कात्रज) जखमी झाले आहेत. नशीब बलवत्तर म्हणून विश्वास कृष्णराव गोडसे, मंजिरी आडकर, विठ्ठल दिघे, प्रदीप राऊत हे वाहनातून सुखरूप बाहेर पडले.

जखमी सहा जणांवर खासगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

# माथेरानकरांचा बेमुदत बंद मागे

## मागण्यांच्या पूर्ततेसाठी प्रशासनाला आठ दिवसांची मुदत

**माथेरान, नेरळ : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये होणाऱ्या पर्यटकांच्या फसवणुकीविरोधात पुकारण्यात आलेला बेमुदत बंद बुधवारी (दि. १९) स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत झालेल्या संयुक्त बैठकीतील चर्चेनंतर मागे घेण्यात आला. माथेरान बचाव संघर्ष समितीने आपल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी प्रशासनाला आठ दिवसांची मुदत दिली आहे.

माथेरानचे प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाक्यावर पर्यटकांची दिशाभूल करून आर्थिक फसवणूक केली जात असल्याच्या तक्रारी वाढल्याने माथेरान बचाव संघर्ष समितीने आक्रमक पवित्रा घेत बंदची हाक दिली होती. या बंदला पहिल्या दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ही परिस्थिती लक्षात घेत माथेरानवासीय, हॉटेल असोसिएशन, सामाजिक संस्था, घोडेवाले, रिक्षावाले, टॅक्सी युनियन तसेच नगर परिषद मुख्याधिकारी, पोलीस निरीक्षक, वन विभाग अधिकारी, अधीक्षक या सर्वांची संयुक्त बैठक बाळासाहेब ठाकरे सभागृहात आयोजित करण्यात आली होती.



या वेळी आमदार महेंद्र थोरवे यांनी प्रशासनाला विविध सूचना केल्या. यामध्ये माथेरानच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ एक अद्ययावत प्रवासी माहिती केंद्र सुरू करावे, जागोजागी पर्यटकांना माहिती उपलब्ध होईल असे फलक लावावेत, दस्तुरी येथील वाहनतळात सीसीटीव्ही कॅमेरे बसविले गेले पाहिजेत तसेच कोणीही या ठिकाणी पर्यटकांच्या गाडीच्या मागे धावत जाता कामा नये याकडे पोलीस प्रशासनाने लक्ष द्यावे, घोडा, ई-रिक्षा, हातरीक्षा, कुली यांच्या व्यवसायावर कोणत्याही प्रकारे गदा येता कामा नये, मुख्याधिकारी तथा प्रशासक यांनी दररोज नगर परिषदेत वेळेत हजर राहिले पाहिजे, याचबरोबर एक समन्वय समिती तयार करावी ज्यामध्ये सर्व क्षेत्रातील दोन सदस्यांची नेमणूक करण्यात यावी, असे आमदार थोरवे यांनी सांगितले.

बैठकीला प्रशासनातर्फे उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ, पोलीस अधिकारी डी.डी. टेळे, अधीक्षक सुरेंद्र ठाकूर, प्रशासक राहुल इंगळे, वन परिक्षेत्रपाल उमेश जंगम, सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने; तर माथेरान पर्यटन बचाव समितीमार्फत सर्वपक्षीय नेते उपस्थित होते. **(पान २ वर..)**

# उलवे नोडमधील सिद्धार्थ दासचा दोरी उडीत अनोखा विश्वविक्रम

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोडमधील सिद्धार्थ संतोष दासने दोरी उडीत विश्वविक्रम करून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये आपले नाव कोरले आहे. या यशाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सिद्धार्थचे विशेष अभिनंदन केले.

सिद्धार्थ दासने अवघ्या एका मिनिटात २७४ वेळा उलट्या दिशेने दोरीवर उड्या मारल्या. हा विश्वविक्रम त्याने रायगड येथे ११ फेब्रुवारी रोजी केला. त्याच्या या अद्भूत कामगिरीमुळे उलवे नोड, पनवेलसह रायगड जिल्ह्याच्या





नावलौकिकात भर पडली असून क्रीडाविश्वात त्याचे कौतुक होत आहे.

सिद्धार्थच्या या यशाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. आहे. या वेळी सिद्धार्थसोबत त्याचे वडील संतोष दास आणि आई शंपा दास हेही उपस्थित होते.

## नागपूरच्या दंगलीत महिला पोलिसाचा विनयभंग

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूर शहरात उसळलेल्या दंगलीने वेगळेच वळण घेतले आहे. भालदारपुरा परिसरात हिंसाचार करणाऱ्या जमावाने अंधाराचा फायदा घेत एका महिला पोलीस कर्मचाऱ्याच्या अंगावर हात उगारला. त्यानंतर अंधाराचा फायदा घेऊन हल्लेखोरांनी महिला पोलिसाची वर्दी फाडण्याचा प्रयत्न करून तिचा विनयभंग केल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे.

जमावाने पोलिसांवर दगडफेक करायला सुरुवात केली. त्यांना शिवीगाळ केली. पोलिसांवर हल्ला चढविला व त्यांना मारहाणही केली. एका जमावाने महिला पोलिसाला पकडले. तिचे कपडे फाडण्याचा प्रयत्न करीत गैरवर्तन केले. वेळीच महिला पोलिसाने स्वतःची सुटका केल्याने मोठा अनर्थ टळला. या प्रकरणी गणेशपेठ पोलिसांनी जमावाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# अंतराळवीर सुनीता विल्यम्स सुखरूप परतल्या

**फ्लोरिडा : वृत्तसंस्था**

अमेरिकेची अंतराळ संस्था 'नासा'मधील भारतीय वंशाची अंतराळवीर सुनीता विल्यम्स तसेच बुच विल्मोर अखेर नऊ महिन्यांनी पृथ्वीवर परतले आहेत. ड्रॅगन कॅप्सूलच्या यशस्वी स्प्लॅशडाउननंतर भारतीय वेळेनुसार बुधवारी (दि. १९) पहाटे हे अंतराळवीर फ्लोरिडा किनारपट्टीवर उतरले.

विल्यम्स आणि विल्मोर ५ जून २०२४ रोजी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात गेले होते. आठ दिवसांच्या मोहिमेचे उद्दिष्ट अनपेक्षित तांत्रिक बिघाडांमुळे नऊ महिन्यांच्या मुक्कामात वाढले. परंतु वाढलेल्या वेळेनंतरही नासाच्या म्हणण्यानुसार या मोहिमेदरम्यान सुनीता विल्यम्स वेगवेगळ्या कामांमध्ये व्यग्र राहिल्या. त्यांनी अंतराळ स्थानकाच्या देखभाल आणि स्वच्छतेमध्ये भूमिका बजावली. संशोधन आणि प्रयोगही केले.

आठ दिवसांच्या मोहिमेवर गेलेले दोघेही नऊ महिन्यांपासून इंटरनॅशनल स्पेस स्टेशनवर अडकून पडले होते. त्यांच्यासह नासाच्या क्रू-९ अंतराळवीर मिशनचा भाग असलेले चौघे सुखरूपपणे परतले.

- नऊ महिन्यांनी पृथ्वीवर
- यशस्वी स्प्लॅशडाऊन
- जगभरातून स्वागत

### पंतप्रधान मोदींकडून कौतुक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुनीता विल्यम्ससह सर्व क्रू-९ अंतराळवीरांचे पृथ्वीवर सुरक्षित परतल्याबद्दल अभिनंदन व कौतुक केले आहे. अंतराळवीरांनी पुन्हा एकदा आपल्याला दाखवून दिले आहे की, चिकाटीचा खरा अर्थ काय असतो. विशाल अवकाशासमोर त्यांचा अढळ दृढनिश्चय लाखो लोकांना कायम प्रेरणा देईल, असे पंतप्रधान मोदींनी म्हटले आहे.



# कोकण रेल्वे महामंडळाच्या विलिनीकरणाचा मार्ग मोकळा -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**मुंबई : प्रतिनिधी**

भविष्यातील प्रकल्पांसाठी तसेच आवश्यक निधीच्या तुटवड्याचे संकट सोडवण्यासाठी केंद्र सरकारच्या प्रस्तावानुसार कोकण रेल्वे महामंडळाचे भारतीय रेल्वेमध्ये विलिनीकरण केले जाणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले.

कोकण रेल्वे महामंडळांदर्भात विधान परिषद सदस्य प्रवीण दरेकर यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती, त्यास मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्तर दिले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कोकण रेल्वे महामंडळाची स्थापना महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक आणि केरळ या चार राज्यांच्या सहकार्याने झाली होती, मात्र आर्थिक विवंचना आणि निधीअभावी महामंडळाला भविष्यातील प्रकल्प राबवण्यात अडचणी येत असल्याने या अडचणींवर तोडगा काढण्यासाठी केंद्र सरकारने महामंडळाचे भारतीय रेल्वेमध्ये विलिनीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयामुळे रेल्वे विभाग कोकण रेल्वेच्या विविध योजनांत मोठ्या प्रमाणात निधी गुंतवू शकणार आहे. दुहेरी रेल्वेमार्ग निर्माण करणे, अपघात प्रतिबंधक उपाययोजना राबवणे, स्थानकांचे आधुनिकीकरण आणि इतर महत्त्वाची विकासकामे वेळेत पूर्ण करता येतील.

विलिनीकरणानंतर कोकण रेल्वेचे नाव तसेच राहणार असून त्याचे स्वायत्त अस्तित्व कायम ठेवले जाईल. यासंदर्भात महाराष्ट्रासह गोवा, कर्नाटक आणि केरळ या तिन्ही राज्यांनीही या प्रस्तावाला संमती दिली असून लवकरच केंद्र सरकारकडे अंतिम प्रस्ताव कळवण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांचे शिवरायांना अभिवादन

**धाटाव : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रोहा तालुक्यात ठिकठिकाणी भाजप रोहा तालुका अध्यक्ष आमित घाग यांनी भेट देऊन शिवरायांना अभिवादन केले.

किल्ला, लांढर, महादेववाडी, तळाघर, वरसे, भुवनेश्वर अशा विविध ठिकाणी त्यांनी भेट दिली. या वेळी त्यांच्यासोबत भाजप तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## कर्जत-मुरबाड महामार्गावर दुचाकी आणि कारचा अपघात; एकाचा मृत्यू, दोघे जखमी

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत - मुरबाड राज्य महामार्गावर कळंब नजिकच्या भागूच्या वाडी येथील वळणावर एका कारची आणि दुचाकीची धडक झाल्याने एकाचा मृत्यू तर दोन जण जखमी झाले आहेत.

कर्जत साळोख येथे वॉल कंपाऊंडचे काम करून सायंकाळचे सहा वाजण्याचे सुमारास आपले घरी जाण्यासाठी दुचाकीवरुन कर्जत मुरबाड राज्यमहामार्गावरून निघाले असताना कळब हद्दीतील भागूचीवाडी येथील वळणा ठिकाणी आले असताना, कर्जतच्या दिशेने येणाऱ्या ब्रेजा कारच्या चालकाचा गाडी वरील ताबा सुटल्याने मुरबाडकडे आपल्या घरी जात असलेल्या दोन दुचाकीनां धडक दिली. त्यांच्या मागुन येणार्या तिसर्या दुचाकीला यापैकी एका दुचाकीची धडक लागली दरम्यान सदर कारचालक तेथून पळून गेला असल्याचे तक्रारदार अरूण लक्ष्मण सांगाळ यांच्या कडून तक्रारीमध्ये नमुद करण्यात आले आहे.




या अपघातामध्ये विष्णू हरी सोंगाळ, विजय मोतीराम मेंगाळ, धनाजी हनुमंत सोंगाळ व मालु बाबू मेंगाळ यांना गंभीर दुखापत झाली असल्याने कळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करून पुढील उपचाराकरीता पनवेल कामोठे येथील एम जी एम रुग्णालयात नेत असताना धनाजी हनुमंत सोंगाळ याचा मृत्यू झाला आहे. विष्णू हरी सोंगाळ, विजय मोतीराम मेंगाळ व मालु बाबू मेंगाळ यांच्यावरती पनवेल कामोठे येथील एम जी एम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर बेजा कार चालक शैलेष दशरथ देशमुख राहणार जडई, ता. मुरबाड जि. ठाणे याच्या विरोधात नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# शेतकरी नेते रविकांत तुपकर यांना खालापूर पोलिसांनी घेतले ताब्यात

**चौक, खोपोली : प्रतिनिधी**



शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी पोलीस उपविभागीय अधिकारी विक्रम कदम व शासनाच्या वतीने निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांच्या बरोबर केलेली चर्चा फिस्कटल्याने अखेर पोलिसांचे कडे तोडून मुंबईला जाण्यासाठी निघालेल्या रविकांत तुपकर यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मंगळवारी रात्री खालापूर तालुक्यातील नढाळ येथे मुक्कामी असलेले शेतकरी नेते रविकांत तुपकर,शेतकरी व मुंबई, कल्याण परिसरातून आलेले शेतकरी कार्यकर्ते मुंबईला सोयाबीन,कपाशी आणि शेतकर्यांचा कोरा सातबारा घेऊन मुंबई येथे अरबी समुद्रात बुडवणार होते.त्यांना शासनाशी चर्चा करायची नव्हती,शासनाला १८ मार्च ही मुदत देण्यात आली होती, या दरम्यान शासनाने कोणतीच दखल न घेतल्याने सरळ समुद्रात बुडवणार असल्याचे उपस्थित शेतकरी यांनी सांगितले.तरीही उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी चर्चा केली. या चर्चेतून काहीच निष्पन्न झाले नाही.

शेकडो शेतकरी यांच्यासह शेतकरी नेते रविकांत तुपकर हे मुंबईला निघाले असता त्यांना प्रवेश द्वारावर अडविण्यात आले, पोलिसांनी वारंवार विनंती करून देखील आंदोलनकर्ते ऐकण्यास तयार नव्हते.अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु असल्याने कायदा व सुव्यस्था बिघडु नये म्हणुन अखेर शेतकरी नेते रविकांत तुपकर यांना पोलिसांनी ताब्यात घेतले उप विभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांच्या नेतृत्वाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी बंदोबस्त ठेवला होता.

# महाडचा सत्याग्रह आता मराठीसह कन्नड भाषेतही; बार्टी संस्थेने घेतला पुढाकार

## सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, डॉ. भाग्यलक्ष्मी यांच्या हस्ते लोकार्पण

**माणगाव : बातमीदार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे अस्पृश्यांना चवदार तळ्याचे पाणी पिण्यासाठी खुले व्हावे याकरिता सत्याग्रह केला आणि हा संघर्ष केवळ पाण्यासाठी नसून मानवी मूलभूत हक्कांसाठी आहे असा आदर्श ठेवला. या संपूर्ण सत्याग्रहाचे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड येथे विद्यार्थ्यांसाठी नागरिकांकरिता सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देणाऱ्या वेबसाईटचे इंग्रजी, मराठी, कन्नड, तमिळ, तेलुगु, मल्याळम या भाषांमध्ये माहिती उपलब्ध करून देणाऱ्या वेबसाईटचे लोकार्पण बार्टीमार्फत सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट व कर्नाटक राज्यात कार्यान्वित असणाऱ्या आंबेडकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या संचालिका डॉ. भाग्यलक्ष्मी यांचे हस्ते २० मार्च रोजी होणार असल्याचे बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांनी सांगितले.

हा कार्यक्रम महाडच्या स्थानिक प्रशासन आणि नागरिकांसाठी महत्त्वाचा आहे. वेबसाईटवर महाडचा इतिहास, पर्यटन स्थळे आणि स्थानिक सेवांची माहिती असेल. या वेबसाईटचा उद्देश पर्यटक आणि स्थानिक नागरिकांना महाडची संपूर्ण माहिती देणे हा आहे.

संकेतस्थळाची वैशिष्ट्ये नागरिकांना सर्व शासकीय सेवांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध, ऑनलाईन तक्रार नोंदविण्याची सुविधा,शहरातील विकासकामाचीमाहिती, महाड शहराचा इतिहास आणि पर्यटन स्थळांची माहिती,नागरिकांसाठी महत्त्वाच्या सूचना आणि बातम्या या संकेतस्थळामुळे महाड शहर डिजिटल दिशेने एक पाऊल पुढे गेले आहे,

या कार्यक्रमात सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट , रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभुमी विकास विभागाचे मंत्री भरत गोगावले, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ , प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे, ओमप्रकाश बकोरिया, आयुक्त समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, बार्टीचे महासंचालक सुनील वारे ,किसन जावळे जिल्हाधिकारी,उपस्थित राहणार आहेत.

## झोपलेल्या मजुराचा ट्रकखाली येऊन मृत्यू

**नवी मुंबई :** ट्रकखाली सावलीला झोपलेल्या पांडुरंग पाटील (वय ४५, रा. कोपरी) या हमाली कामगाराचा ट्रकखाली चिरडून मृत्यू झाला. एपीएमसीमधील दाणा मार्केटच्या गेटवर सोमवारी दुपारी ही घटना घडली. याप्रकरणी त्यांचे भाऊ दादासो पाटील (५०) यांच्या तक्रारीवरून एपीएमसी पोलिस ठाण्यात अज्ञात ट्रक चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रस्त्यालगतच्या ट्रकच्या सावलीला बसले असताना पाटील यांना झोप लागली. ट्रक चालकाने खाली न पाहताच ट्रक नेला. यात ट्रकखाली चिरडून पाटील यांचा मृत्यू झाला.

## खालापूर टोलनाक्याजवळ दोन दिवसांत दुसऱ्यांदा टँकरमधून वायूगळती



**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरील पुणे लेनवर खालापूर सावरोली टोल नाक्याजवळ केमिकल टँकर लिकेज झाल्याने मोठ्या प्रमाणात गळती होऊन खालापूर सावरोली धामणी देवन्हावे व परीसरातील रहिवासी गावात उग्र वासाने काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते.

महामार्ग पोलिस व सामाजिक कार्यकर्त्यांनी घटनास्थळी दाखल होत टँकर मधील वायु गळती बंद केली रसायन ट्रान्सफर करुन दुसऱ्या टँकर मध्ये शिफ्ट करण्यात आले. हि प्रक्रिया रसायन तज्ञ धनंजय गिध यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. बुधवारी पहाटे ही घटना घडली. टँकर मधून. वायू गळती होण्याची सलग दोन दिवसांतील हि दुसरी घटना आहे.

दुसऱ्या घटनेत मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील सावरोली टोल नाका हद्दीत शिवनेरी बसने केमिकलच्या टँकरला मागून जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला . मुंबई पुणे एक्सप्रेस वे वर किलोमीटर ३० च्या दरम्यान केमिकल टँकरला शिवशाही बसने मागून धडक दिली.

टँकर मधील रसायनाची गळती झाल्याने रसायन तज्ञ धनंजय गिध यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परीक्षण केले. खालापूर टोल नाक्याजवळ पुणे लेनला हा अपघात घडला. एच सी एल ऍसिड वाहक टँकर पुणे येथे जात असताना. शिवनेरी बस पाठीमागून धडकली: टँकरचा वॉलव्ह डॅमेज झाला होता त्या जागी नवीन फ्लेंज बसवून धनंजय गीध यांनी लिकेज् कंट्रोल केले. ही घटना मंगळवारी दुपारी १ वाजण्याचे सुमारास घडली.

## माणगाव उपजिल्हा रुग्णालयात महिलेने दिला तिळ्यांना जन्म

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव उपजिल्हा रुग्णालयात रोहा तालुक्यातील पुईच्या एका २३ वर्षाच्या महिलेने मंगळवार दि.१७ मार्च रोजी तीन बालकांना जन्म दिला असुन माता व बालके सुखरुप आहेत

रोहा तालुक्यातील पुई गावची महिला मनिषा अजय कातकर या महिलेला माणगाव उपजिल्हा रूग्णालयात आणले. या ठिकाणी डॉ. रामदास तरपेवाड परीचारीका अनिता करकरे, वनिता तेटगुरे, सीक्युरीटी गार्ड वैशाली घोगरे यांनी या महिलेची नैसर्गिक प्रसुती यशस्वीरित्या केली. या महिलेने तीन बालकांना जन्म दिला आहे.

या महिलेने तीन बाळांना जन्म दिला असुन पहिल्या बाळाचा जन्म दुपारी ३ वाजुन ५८ मिनीटांनी होऊन त्याचे त्यानंतर एक एक मिनीटाच्या अंतराने दुसर्या बलाकांचा जन्म झाला प्रसुतिनंतर माता व तिन्ही बाळांची प्रकृती ठिक आहे. महिलेच्या नातेवाईकांनी डॉ. रामदास व त्यांच्या सर्व टिमला ख़ास धन्यवाद देत त्यांचे विशेष आभार मानले आहेत.डॉक्टर व त्यांच्या टिमचे रूग्णालयीन कमिटी सदस्य नरेश राजपुत यांनी विशेष कौतुक करीत अभिनंदन केले.

### पान १ वरुन

## एमपीएससीद्वारे पुढील काळात मोठी भरती

प्रश्नपत्रिका तयार करणे, परीक्षा घेणे ही सर्व कामे एमपीएससीकडूनच होतात. केवळ काही इन्फ्रास्ट्रक्चर बाहेरून घेतले जाते. बाकी सर्व कामे आयोगाकडूनच होतात. एमपीएससीने गेल्या काही वर्षात पारदर्शक पद्धतीने परीक्षा घेण्याचा उपक्रम चालवला असून त्यात कोणताही गोंधळ झालेला नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगात रिक्त असलेल्या तीन जागा भरण्यासाठी तत्काळ कार्यवाही करण्यात येत आहे, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस यांनी लोकसेवा आयोगाला नवे स्वरूप दिले जाईल. वर्ग १ आणि वर्ग २बरोबर आता वर्ग ३ही आपण एमपीएससीला दिले आहे. सर्व परीक्षा वेळेत घेण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, असे सांगितले.

## कुष्ठरोग निर्मूलनासाठी शासनाचा पुढाकार

याचबरोबर जिल्हा व तालुका मुख्यालयाच्या वर्दळीच्या ठिकाणी कुष्ठरोगविषयक होर्डिंग्सद्वारे जनजागृती करण्यात येते. आरोग्य संस्था व शासकीय कार्यालयाच्या ठिकाणी मराठीतील बॅनर पोस्टरद्वारे आणि मोक्याच्या ठिकाणी भिंतीवर कुष्ठरोगविषयक संदेश लिहून तसेच आरोग्य कर्मचारी व आशा कार्यकर्तीव्दारे गृहभेटीदरम्यान प्रत्यक्ष भेटी देऊन कुष्ठरोगाविषयी जनजागृती करण्यात येते, अशी माहिती देऊन राज्यात कुष्ठरुग्णांसाठी रुग्णालयीन व पुनर्वसन तत्वावर कार्य करणाऱ्या सेवाभावी स्वयंसेवी संस्थांना प्रती कुष्ठरुग्ण शासनाकडून सध्या दिल्या जाणाऱ्या अनुदानात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडून नियोजन व वित्त विभागाकडे सादर करण्यात आल्याचीही माहिती मंत्री प्रकाश आबिटकर यांनी लेखी उत्तरात दिली.

## माथेरानकरांचा बेमुदत बंद मागे

यामध्ये प्रामुख्याने माजी नगराध्यक्ष अजय सावंत, मनोज खेडकर, विवेक चौधरी, प्रेरणा सावंत, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, भाजप शहराध्यक्ष प्रवीण सकपाळ, रिक्षा चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष राजेश चौधरी, हॉटेल असोसिएशनचे अध्यक्ष उमेश दुब्बल, अश्वपाल संघटनेच्या अध्यक्ष आशा कदम, मूळ वासी संघटनेचे अध्यक्ष संतोष शिंगाडे, ॲड. संतोष आखाडे, रूपाली आखाडे, राजेश दळवी, चंद्रकांत चौधरी यांच्यासह नागरिक उपस्थित होते. सकारात्मक चर्चेअंती बंद मागे घेण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले.

## नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत असणारे वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी मंगळवारी (दि.१८) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३१७ व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली. विविध वाहतूकीचे नियम भंग केल्याप्रकरणी त्यांच्याकडून तीन लाख एक हजार ४५० रुपये इतका दंड आकारला आहे.

# होळीनिमित्त आलेल्या बोटी पुन्हा समुद्राकडे रवाना

**मुरुड : प्रतिनिधी**

कोकणात होळीचा सण मोठ्या आनंदात साजरा केला जातो.कोकणातील शिमगा म्हणजे होळीचा मोठा उत्सव होळी रंगाच्या आणि उधळलेल्या प्रेम आणि आनंदाचा सण,हा सण कोळी बांधवांचा मोठा उत्सव या दिवशी सर्व परिवार एकत्र येतो.आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह साठी मुंबई येथील समुद्रात मासेमारी करिता गेलेले कोळी मच्छीमार बांधव होळी सणाच्या शेवटच्या आदल्या दिवशी मुंबईतून निघताना आपल्या बोटीला विविध रंगीबेरंगी कापडाच्या झुले, आकर्षक रंगाच्या पताका, फुले, झेंडे आदींनी वस्तू नी सजवुन त्यानंतर पारंपरिक वेषभूषा परिधान करून समुद्रात असणाऱ्या खंदेरी उदरी वेताळेश्वर देवाचे दर्शन घेऊन त्याची पूजा-अर्चा केली जाते.

मुरुड - एकदरा बंदरातील मच्छीमार कोळी बांधव होळी उत्सव साजरा करण्यासाठी शेकडो कोळी मच्छीमार बांधव आपल्या घरी आले होते.होळी सणासाठी खोल समुद्रात गेलेल्या बोटी परत किनारी येऊन आठ ते दहा दिवसाचा विश्रांती काळ घेऊन पुन्हा नव्या उमेदीने मासेमारी करण्यासाठी बोटी खोल समुद्रात जाऊ लागल्या आहेत.दोन सिलेंडर व चार सिलेंडर होड्या खोल समुद्रात जाऊ लागल्या आहेत.होडीवर लागणारी सर्व यंत्र सामुग्री व भोजनासाठी लागणारे सर्व साहित्य घेऊन बोटी पुन्हा नव्या उमेदीने खोल समुद्रात रवाना होत आहेत.मुरुड तालुक्यात ७५० छोट्या व मोठ्या होड्या बोटी खोल समुद्रात रवाना होताना दिसत आहेत.



### मासेमारी मुबलक प्रमाणात होण्यासाठी देवाची केली आराधना

आता उत्सव आटोपून पुन्हा आपल्या उदार निर्वाह साठी मासेमारी करण्याकरिता खोल समुद्रात जाण्यासाठी सज्ञ झाले असुन त्याची लगबग समुद्रकिनाऱ्यावर दिसुन येत आहे.

खोल समुद्रात निघण्यापूर्वी शेकडो बोटीची डागडुजी कामे पुर्ण करुन मच्छीमार कोळी बांधव रंगपंचमीच्या मृहर्तावर खोल समुद्रात जाण्यास निघतात .मोठ्या बोटीवर खोल समुद्रात मासेमारी करित असताना भरपूर दिवस राहावे लागते यासाठी मिळालेली मासळी ताजी राहावी यासाठी मोठ्या प्रमाणात बर्फ भरण्यात येत आहे.रॉकेल, डिझेल,महिनाभर पुरेल एवढे धान्य, खाद्यपदार्थ व विविध वस्तू बोटीवर भरण्यास सुरुवात केली आहे. विविध संकटाना सामोरे जाणारे मच्छीमार पुन्हा नव्या उमेदीने मासेमारी करण्यासाठी खोल दर्यात जाण्यास सज्ञ झाले आहे. संकटचा काळ संपुन मासेमारी मोठ्या प्रमाणात होऊन झालेला कर्ज फिटो धंद्यात चांगला फायदा मिळावो हीच प्रार्थना समस्त कोळी समाज ईश्वराकडे करित आहेत.सध्या मच्छिमारांना मुबलक मासळी मिळत नाही.त्यामुळे मच्छिमारांना खूप दूरवर जाऊन मासळी मिळवण्यासाठी डिझेलचा अतिरिक्त खप सुद्धा वाढला आहे. आज डिझेल दर सुद्धा वाढला असल्याने मच्छिमार कर्ज घेऊन मासळी व्यवसाय करीत आहेत.परंतु मोठ्या प्रमाणात मासळी न मिळाल्यामुळे मच्छिमारांच्या डोक्यावरील कर्ज वाढत आहे.

येणारा आगामी काळ हा खूप चांगला जावा व मासळी मोठ्या प्रमाणात भेटावी अशी प्रार्थना ईश्वरकडे करून बोटी खोल समुद्रात जात आहेत.

रामप्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

### दुखवटा

## काळुराम बोराडे



**कर्जत :** तालुक्यातील हालिवली गावातील रहिवासी ह. भ. प. काळुराम गणपत बोराडे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. निधन समयी ते ७६ वर्षांचे होते. हालिवली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच दीपक बोराडे यांचे ते वडील होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सूना, नातवंडे असा परिवार आहे.

## निवडक

### जप्त वाहनांचा होणार लिलाव

**पनवेल :** तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध गुन्ह्यामध्ये जप्त केलेल्या एकूण १० वाहनांचा जाहीर लिलाव २१ मार्च २०५ रोजी सकाळी ११ वाजता ठेवण्यात आला आहे. वाहनांमध्ये लाल बजाज स्कुटी, लाल व काळी बजाज पल्सर मोटरसायकल, काळी मारुती ईस्टीम कार, होंडा सिटी कंपनीची सोनेरी कार, टोयॉटो स्टीओस कार, स्कोडा कार, चॉकलेटी टेम्पो, रिटस् मारुती कार, काळी पिवळी ऑटो रिक्षा व सोनेरी फियाट कार अशा १० वाहनांचा जाहीर लिलाव तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांनी दिली.

### कळंबोलीतून विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक विवाहिता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची



तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सना बानो खुर्शीद आलम शहा (२६ रा.कळंबोली) रंग गोरा, चेहरा गोल, नाक सरळ, नाकात नथनी, उंची अंदाजे पाच फुट सात इंच, अंगाने मध्यम, डोळे काळे व मोठे, डोक्याचे केस काळे व लांब असून अंगात मेहंदी रंगाचा सलवार कुडता व त्यावर काळा बुरखा, पायात चांदीचे पैंजण व काळे बुट, सोबत गोल्डन पर्स आहे. तिला हिंदी व उर्दु भाषा अवगत आहे. या महिलेबाबत माहिती असल्यास त्यांनी कळंबोली पोलीस ठाणे (०२२-२७४२३०००) किंवा हवालदार जे.पी.पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पळस्पे गावातून एक जण बेपत्ता

**पनवेल :** घराबाहेर चक्कर मारुन येतो असे सांगून घराबाहेर पडलेला एक व्यक्ती अद्याप घरी न परतल्याने



तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. राजकुमार शेळके (५८ रा.पळस्पे गाव) रंग सावळा, उंची पाच फुट आठ इंच, बांधा मध्यम, चेहरा गोल, डोक्याचे केस सफेद व काळे असून अंगात पायजमा व सफेद शर्ट घातलेला आहे. पायात चप्पल आहे. त्यांना मराठी, हिंदी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा हवालदार अतुल देवकर यांच्याशी संपर्क साधावा.

### अज्ञाताचा आढळला मृतदेह

**पनवेल :** एका व्यक्तीचा मृतदेह कळंबोली वसाहत परिसरातील पुरुषार्थ पेट्रोल पंप ब्रीजच्या जवळ आढळून आला आहे. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्ष, डी कंपोज झालेला मृतदेह असून या ठिकाणी हागणदारी असल्याने व मृतदेहाचे पॅन्टचे हुक खोलले असल्याने तो शौचास गेला असावा असा कळंबोली पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कळंबोली पोलीस ठाणे (०२२-२७४२३०००) किंवा सहाय्यक निरीक्षक अजय चव्हाण (९८७०२९१०२६) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पाले बुद्रुकमध्ये एकाची आत्महत्या

**पनवेल :** आर्थिक विवंचनेतून एका तरुणाने आत्महत्या



केल्याची घटना पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. पाले बुद्रुक येथे राजकुमार गुलीचंद रंजक (वय ४२) याने आर्थिक विवंचनेतून पंख्याला नायलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याला दारू पिण्याचे व्यसन होते. पनवेल तालुका पोलीस ठाण्यात घटनेची नोंद झाली आहे.

### कारच्या धडकेत महिला जखमी

**पनवेल :** कारने दिलेल्या धडकेत कल्पना पवार (वय ५९) जखमी झाल्या. याप्रकरणी कारचालकाविरोधात




पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कल्पना जेवण करून बाहेर फिरण्यासाठी गेल्या होत्या. त्या इच्छापूर्ती गणपती मंदिराच्या बाजूने बालाजी अंगण बिल्डिंगकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला बसलेल्या असताना गाडीवरील चालकाने त्यांची कार वळविताना कल्पना यांना ठोकर मारली. यात त्या जखमी झाल्या. त्यांना हॉस्पिटलमध्ये नेले असता त्यांच्या पायाला, हाताला फॅक्चर झाले आहे.

### तरुणाच्या पोटात खुपसला चाकू

**पनवेल :** ठार मारण्याच्या उद्देशाने पोटात चाकू खुपसून गंभीर दुखापत केल्याप्रकरणी सुनील नागपाल मंडल याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात बीएनएस कलम १०९ अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. विकास साहू (वय ३०) त्यांच्या मुलीला घेऊन सेक्टर ३, पुष्पक नगर, दापोली, पनवेल येथे दुकानातून खाऊ आणण्यासाठी गेले. या वेळी सुनील तेथे आला. विकास याने तू माझ्या घरी का पाहतो, असे विचारले असता चिडलेल्या सुनीलने त्याच्या पोटात चाकू खुपसला.

### आरोपीची तळोजा कारागृहात रवानगी

**पनवेल :** टँकरच्या चाकाखाली आल्याने तिघांचा मृत्यू झाल्याप्रकरणी टँकर चालकाला पनवेल तालुका पोलिसांनी अटक केली होती. न्यायालयाने त्याची रवानगी तळोजा कारागृहात केली आहे. कोन गावाजवळ टँकर आणि एक्टिवा स्कुटीच्या झालेल्या अपघातात शोभित सालुजा, जुई सालूजा आणि लाडो सालुजा या तिघांचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी टँकर चालक गहिनीनाथ गर्जे याला अटक केली. सालुजा कुटुंबीय कामोठे येथे भाड्याने राहत होते ते मूळचे सुरत येथील आहेत. टँकरचालकाला न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली.

# पनवेल मनपाकडून वर्षभरात ३७० कोटींचा मालमत्ता कर वसूल

## ◆ आजवरील सर्वाधिक वसुलीचा विक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने २०२४-२५ या आर्थिक वर्षात ३७० कोटींची वसुली केली असून हा आजवरील सर्वाधिक वसुलीचा विक्रम आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कर विभागाने नियोजनबध्द पध्दतीने रूपरेषा आखून वसूलीचा हा विक्रम केला आहे. मालमत्ताकर विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या नियंत्रणाखाली योग्य उपाय योजना राबवत उच्चांकी महसूल महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे.



मालमत्ता कर विभागाचे कर अधिक्षक महेश गायकवाड व सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली मुख्यालय व चारही प्रभागामधील कर्मचारी मार्च महिना संपेपर्यंत कोणतीही सुट्टी न घेता शनिवार, रविवारीदेखील कार्यालये सुरू ठेवून काम करत आहेत. पालिकेचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी थकबाकीदारांवरती अटकावणी कारवाई सुरू आहे. या वसुलीसाठी महापालिकेच्यावतीने या वेळी १३ पथके कार्यरत आहेत. प्रभाग अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ही पथके सर्व प्रभागांमध्ये वसुलीसाठी जात आहेत.

पनवेल महापालिकेचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून महानगरपालिकेने सिडको हस्तांतरीत भाग, मार्बल मार्केट, जवाहर औद्योगिक वसाहत, तळोजा औद्योगिक वसाहत, पनवेल औद्योगिक वसाहत अशा विविध भागांमध्ये व्यवसायिक मालमत्ता करधारकांडून वसुलीची थेट कारवाई सुरू केली आहे. ज्या थकबाकीदारांना जप्ती नोटीसा दिल्या आहेत त्यांना आता वॉरंट नोटीसा देण्याचे काम पालिकेने सुरु केले आहे. तसेच अटकावणीच्या मोहिमेलाही सुरूवात करण्यात आली आहे. याचा थकबाकीदार यांनी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

मार्च महिन्यात दररोज एक कोटीचा कर महापालिकेच्या तिजोरीत जमा होत असून त्यामध्ये बुधवारी (दि.१९) महापालिकेने मागील वर्षाचा विक्रम मोडित काढत विक्रमी वसुली केली आहे. मागील वर्षी ३१ मार्च अखेर एकुण ३६० कोटीचा भरणा झाला होता. हा विक्रम यावर्षी १० दिवस आधीच मोडित काढला आहे.

दरम्यान, मालमत्ता कर हा महापालिकेचा मुख्य आर्थिक स्त्रोत असल्याने नागरिकांनी मालमत्ता कर भरून महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आली आले आहे.

## खांदा कॉलनीमध्ये एटीएम लुटण्याचा प्रयत्न

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात दोन चोरट्यांनी खांदा कॉलनी सेक्टर ८ मधील बँक ऑफ इंडियाच्या एटीएम सेंटरमध्ये प्रवेश करून एटीएम मशीन व कॅश डिपॉझिट मशीन फोडून त्यांतील रोख रक्कम लुटण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना एटीएममधील पैसे चोरता न आल्याने त्यांना हात हलवत परतावे लागले. याप्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी अज्ञात दोन चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

या घटनेतील दोन अज्ञात चोरट्यांनी पहाटेच्या सुमारास खांदा कॉलनी सेक्टर ८ मधील बँक ऑफ इंडियालगत असलेल्या एटीएम सेंटरमध्ये प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी लोखंडी सळईच्या सहाय्याने एटीएम मशीन व कॅश डिपॉझिट मशीन फोडून त्यांतील पैसे चोरण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना दोन्ही मशिन्समधील पैसे काढता आले नाहीत. त्यामुळे या चोरट्यांना तेथून रिकाम्या हाती पळ काढावा लागला.

या एटीएममध्ये काही ग्राहक पैसे काढण्यासाठी गेले असता, हा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. त्यावर काही नागरिकांनी बँकेच्या अधिकार्यांना याबाबतची माहिती दिल्यानंतर त्यांनी सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता, दोघा चोरट्यांनी या एटीएम सेंटरमध्ये प्रवेश करून एटीएम मशीन फोडण्याचा प्रयत्न केला.



**पनवेल : खारघर इस्कॉन मंदिराच्या वतीने खांदा कॉलनीत गौर पौर्णिमेचा कार्यक्रम झाला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमादरम्यान मंदिरातील वरिष्ठ प्रचारक सौरी चैतन्य दास यांनी प्रवचन दिले. या वेळी शेकडो भक्तगण तसेच प्रकाश खानावकर, भीमराव पोवार आदी भाजपचे खांदा कॉलनीमधील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप नेते तथा माजी जि.प.सदस्य एकनाथ देशेकर यांचा वाढदिवस करुणेश्वर भानघर शांतीवन आश्रमात साजरा करण्यात आला. या वेळी माजी सरपंच नरेश पाटील, भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष कमला देशेकर, माजी उपसरपंच राजेश भोईर, रवींद्र पाटील, अनिकेत देशेकर आदी उपस्थित होते.**



**कामोठे : येथील सेक्टर २१मध्ये अलाइव्ह गार्ड या मल्टीस्पेशालिटी डेंटल क्लिनिकचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत यांच्या हस्ते झाले. या वेळी डॉ. कोमल कुंभार, सचिन यमगर, सुयोग वाफारे, सुहास भदोडकर, शैलेश परबलकर, विजय देवकाते आदी उपस्थित होते.**

## खारघरमध्ये अज्ञाताकडून पोलिसाच्या वाहनांची तोडफोड

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर १३ येथील दुर्गा सदन सोसायटीत राहणाऱ्या एका पोलिसाच्या कारसह दुचाकी अशा दोन वाहनांची अज्ञाताने तोडफोड करून नूकसान करण्याची घटना घडली. यात वाहनांचे नुकसान करण्यात आले.

मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेले पोलीस कॉन्स्टेबल उमेश चव्हाण हे कुटूंबासह खारघर सेक्टर १३ येथील दुर्गा सदन सोसायटीत राहतात. पोलीस हवालदार चव्हाण यांची मारूती सुझुकी सेलोरो कार (एमएच ४६ बीई ९२६५) व मोटरसायकल (एमएच ४६ एम ७४५५) ही दोन वाहने त्यांनी आपल्या राहते दुर्गा सदन सोसायटी परिसरात पार्क करून ठेवली असता, एका लाल टी शर्ट परिधान केलेल्या अज्ञात तरूणाने चव्हाण यांच्या सेलोरो कारची पुढील व पाठीमागील काच व आरशाची तसेच दुचाकीचा आरसा याची तोडफोड केली आहे. या तोडफोडीत चव्हाण यांच्या वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर या घटनेबाबत पोलीस कॉन्स्टेबल उमेश चव्हाण यांच्या पत्नीने खारघर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात इसमाविरोधात बीएनएस ३२४(४) प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

दरम्यान, पोलीस कॉन्स्टेबल चव्हाण यांच्या वाहनांचे नूकसान करणारी व्यक्ती ही सोसायटीच्या सीसीटिव्ही कॅमेर्यात कैद झाली असून, हा प्रकार करणारी व्यक्ती ही सोसायटी परिसरातील नसल्याचे त्यांनी सांगितले. एकंदरीत या प्रकारामुळे येथील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, पोलीस कॉन्स्टेबल चव्हाण यांच्या या गाड्याची नासधूस कोणी व कशासाठी केली याबाबतचा तपास खारघर पोलीस करत आहेत.

# पनवेलमध्ये एक दिवस पाणीपुरवठा राहणार बंद

**पनवेल : वार्ताहर**

सालाबादाप्रमाणे पनवेल शहरातील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागणार आहे. पनवेल महापालिकेने मंगळवारी याबाबतची जाहीर सूचना प्रसिद्ध करून कोणत्या जलकुंभावरील पाणी ग्राहकांना आठवड्यातील कोणत्या दिवशी पाणी मिळणार नाही याची सूचना प्रसिद्ध केली आहे. २० मार्चपासून पालिकेला नियोजन करावे लागले.

पनवेल शहरातील रहिवाशांना ३२ दशलक्ष लीटर (एमएलडी) पाण्याची आवश्यकता आहे. देहरंग येथील अप्पासाहेब वेदक धरणातील शिल्लक पाण्याचा साठा संपूर्ण उपसा केला तर मे महिन्यापर्यंत जलाशयातील सर्व पाणी संपून जाईल. यासाठी महापालिकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एमजेपी), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) या संस्थांकडून पाताळगंगा नदीतील उसनवारीने पाणी घेऊन पनवेल शहरातील नागरिकांना पुरवठा केला जातो. रविवार आणि सोमवार पाताळगंगा नदीतून मिळणारा पाणीपुरवठा कमी होतो. तसेच इतरवेळी तांत्रिक दुरुस्तीच्या कारणामुळे पाणी पुरवठा अनियमित होत असल्याने देहरंग धरण आणि पाताळगंगा नदीतील पाणी साठ्याच्या नियोजनासाठी पनवेल शहरातील नऊ वेगवेगळ्या जलकुंभनिहाय पाणीपुरवठा केला जात असल्याचे पनवेल पालिकेचे पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता विलास चव्हाण यांच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

यामध्ये **शुक्रवारी** जलकुंभ गोल टाकी (WTP) येथील मिडलक्लास हो. सोसा भाग -१ व २, एस के बजाज भागाचा पाणी पुरवठा बंद राहिल. **शनिवारी** गंगाराम सिनेमा उंच जलकुंभ येथील तक्का गाव व कॉलनी भाग बंद राहील. **रविवारी** शहरातील सर्वभागात पाणीपुरवठा सुरू राहील. **सोमवारी** १) मार्केटयार्ड उंच जलकुंभ येथील संपूर्ण भाग

### महापालिकेकडून नियोजन



बंद राहील २) भाजी मार्केट उंच जलकुंभ येथील संपुर्ण भाग बंद राहील ३) चौकोनी टाकी (थढझ) येथील १) पटेल पार्क, जैन मंदीर, गणपती मंदीर २) मामलेदार कचेरी ते दत्तराज सो.. साठेगल्ली ते विरुपाक्ष मंदीर, सिटी स्टोअर, सिनीयर ज्यूनियर गल्ली, आगरी समाज हॉल ते घोडके हॉस्पिटल, गायकर गल्ली बैठे घर, शुभलाभ सो. ते सहयोग नगर, सुतिका गृह ते यशोमंगल सो., उमाशंकर सो. ते यशोवर्धन सो., आदर्श हॉटेल ते रत्नेश सो., कुबेर सो. ते शुभलाभ सो., धुतपापेश्वर कारखाना ते मुनोथनगर, मुनोथनगर ई विंग, पिन्स पॅराडाईज सो.. सनराईज सोसा, जोशी आळी इत्यादी. ३) पंचायत समिती झोपडपट्टी, कोहिनुर टेक्निकल ते किंग्ज इलेक्ट्रॉनिक्स, कोहिनुर टेक्निकल ते नवनाथ मंदीर, लक्ष्मी वसाहत. तर सोमवारी माणिक नगर,अशोक गार्डन, केशवबाग, स्नेहसदन सो., यशोदिप, शिवसेना कार्यालय, भैरवनाथ डेअरी, मांडवकरवाडा, गुढेकर डेअरीते रेखी हॉटेल पर्यंत, घाटेआळी, गावदेवी पाडा, परदेशी आळी, गुढेकर डेअरी ते खुटकर मटण शॉप, वैद्य ते श्रीलॉज् पर्यंत, गुणे हॉस्पिटल ते लाईफ लाईन हॉस्पिटल ते खुटकर मटण शॉप इत्यादी २) दांडेकर हॉस्पिटल ते श्री. अच्युत मनोरे घरापर्यंत, गुडेकर डेअरी ते घोडके हॉस्पिटल, परदेशी आळी बैठी घरे, रत्नारेसिडेन्सी सो.. अष्टविनायक कॉलनी, गुणे हॉस्पिटल ते शिवाजी महाराज पुतळ्या पर्यंत, श्री लॉज ते निलेठा गार्डन पर्यंत, सुभेदार वाडा, आदर्श हॉटेल ते शिवाजी महाराज पुतळ्या पर्यंत, यशोपुरम सो., जूना पोष्ट बाजू, मुनोथ नगर अ,इ, विंग ३) जयभारत नाका ते भिडे घरापर्यंत. गांगल वाडा, महाड बँक. आदर्श हॉटेल ते जयभारत नाका, गोडसे आळी, विरुपाक्ष मंदीर ते दगडी शाळा, मनिष मार्केट, अन्नपुर्णा ते निसर्ग बिल्डींग, त्रिमुर्ती सहनिवास, कापड बाजार, गोखले हॉल ते प्रज्ञा सो., रतन टॉकीज परिसर इत्यादी येथील पाणीपुरवठा सुरू राहणार आहे. **मंगळवारी** १) पटेल मोहल्ला उंच जलकुंभ संपुर्ण भाग बंद राहील. २) पायोनिअर उंच जलकुंभ पायोनिअर सोसायटी जलकुंभातुन होणारा पाणी पुरवठा व ठाणा रोड बंद राहील. **बुधवारी** एचओसीउंच जलकुंभ येथील संपुर्ण भाग बंद राहील. **गुरुवारी** ठाणा नाका उंच जलकुंभ येथील संपुर्ण साईनगर भाग बंद राहील.

## उरणमध्ये उद्या रक्तदान शिबिर

**उरण : वार्ताहर**

ओएनजीसी उरण प्लांट यांच्या सौजन्याने व पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन उरण आयोजित रक्तदान शिबिर शुक्रवारी (दि.२१) सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत द्रोणागिरी भवन, ओएनजीसी उरण प्लांट उरण येथे आयोजित करण्यात आले आहे. रक्तदात्यांना आकर्षक भेटवस्तू देण्यांत येणार आहे.

या शिबिरास प्रमुख पाहुणे समूह महाव्यवस्थापक -संयंत्र व्यवस्थापक उरण देवेंद्र कुमार त्रिवेदी, महाव्यवस्थापक प्रभारी मानव संसाधन भावना आठवले, माजी सरचिटणीस पीईयू मुंबई उपाध्यक्ष जीईएनए खानविलकर, सरचिटणीस पीईयु मुंबई संतोष पाटील, व्यवस्थापक गौरव पतंगे आदी उपस्थित राहणार आहेत. पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन उरण सेक्रेटरी समाधान मढवी, व्हीलेश घरत व पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियनचे सदस्य, आदींचे सहकार्य मिळणार आहे.

## संपादकीय

# जगभरासाठी प्रेरणादायी!

अंतराळयानातील तांत्रिक बिघाडामुळे ठरलेल्या आठ दिवसांऐवजी गेले तब्बल नऊ महिने आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकावर अडकून पडलेले अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर बुधवारी सुखरूप पृथ्वीवर परतले. अंतराळातील दीर्घ मुक्कामाला त्यांनी ज्या चिकाटी आणि धीराने तोंड दिले, ते जगभरातील सगळ्यांसाठीच प्रेरणादायी आहे. अवघ्या जगाचे लक्ष त्यांच्या परतीच्या प्रवासाकडे होतेच. परंतु सुनीता ही मूळची भारतीय वंशाची सुनीता पंड्या असल्याने तिच्या या कामगिरीचा व सुखरूप परतण्याचा भारतीयांना झालेला आनंद आगळा आहे.

**सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर या दोन अंतराळवीरांनी ५ जून २०२४ रोजी परीक्षणयान स्टारलाइनरमधून आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकाकडे झेप घेतली, तेव्हा ते आठ दिवस अंतराळस्थानकावर घालवून पृथ्वीवर परतायचे या तयारीनिशी निघाले होते. परंतु त्यांच्या अंतराळयानात बिघाड झाला आणि हे दोघेही तिथेच अडकून पडले ते तब्बल २८४ दिवसांकरिता. भारतीय वेळेनुसार बुधवारी, १९ मार्च रोजी पहाटे ३ वाजून २७ मिनिटांनी या दोघांसह इतरही दोन अंतराळवीर सुखरूप पृथ्वीवर परतले आणि अवघ्या जगभराला आनंद झाला. अंतराळमोहिमेत असंख्य जोखमी गृहित धरलेल्या असतातच. त्यादृष्टीने अंतराळवीरांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम करण्याचे प्रशिक्षणही दिलेले असते. परंतु जोखमींची तयारी वेगळी आणि प्रत्यक्षात अंतराळात अनिश्चित काळासाठी अडकून पडणे वेगळे. एक-दोन नव्हे तर तब्बल नऊ महिने अंतराळस्थानकावर अडकून पडलेल्या सुनीता आणि बुच यांनी कमालीच्या शारीरिक-मानसिक क्षमतेने या संकटाचा सामना केला. मानवी चिकाटी, दुर्दम्य इच्छाशक्ती, हिंमत आणि आत्मविश्वासाचे एक कमालीच्या उंचीचे प्रेरणास्थान या दोघांनी निर्माण केले आहे. हे दोघे इतका दीर्घ काळ अंतराळात राहून सुखरूप पृथ्वीवर परतल्यामुळे त्यांच्या अनुभवांतून मानवजातीला खूप काही ज्ञात होणार आहे, शिकता येणार आहे. गेल्या वर्षी जूनमध्ये ते अंतराळस्थानकावर पोहोचले, त्यानंतर ते ज्या स्टारलाइनर अंतराळयानातून तिथे गेले होते, त्यात काही तांत्रिक बिघाड निर्माण झाले. त्यामुळे या अंतराळवीरांनी त्यातून परतीचा प्रवास करणे सुरक्षित उरले नाही. त्यामुळे स्टारलाइनर त्यांच्याविनाच सप्टेंबर २०२४ मध्ये पृथ्वीवर परतले. सुनीता आणि बुच यांच्या परतीच्या प्रवासाची पर्यायी व्यवस्था करण्यात तब्बल नऊ महिने गेले. अखेर स्पेसएक्स ड्रॅगन फ्रीडम अंतराळयानातून ते सुखरूप पृथ्वीवर परतले आहेत. अन्य दोघे अंतराळवीर निक हेग आणि लेक्झांद्र गोर्बुनोव्ह यांचाही अंतराळस्थानकावरील कालावधी पुरा झालेला असल्याने ते दोघेही सुनीता आणि बुच यांच्यासोबत पृथ्वीवर परतले. सुनीता आणि बुच यांच्या अंतराळातील दीर्घ वास्तव्याचा संशोधन व अभ्यासाच्या दृष्टीने मानवजमातीला खूप मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे त्यादृष्टीनेही त्यांच्या कामगिरीचे योगदान आहेच. परंतु वैयक्तिकदृष्ट्या त्यांना मात्र अंतराळातील दीर्घ वास्तव्यानंतर अनेक शारीरिक व मानसिक आव्हानांना व समस्यांना सामोरे जावे लागू शकते असे म्हटले जाते आहे. या अंतराळवीरांचा स्पेस स्टेशन ते पृथ्वीपर्यंतचा प्रवासच सलग १७ तासांचा होता. पृथ्वीच्या वातावरणात शिरल्यानंतर अंतराळवीर बसलेल्या कॅप्सूलभोवतीचे तापमान वाढते. ड्रॅगन फ्रीडमने सोसलेले सर्वोच्च तापमान १९२६.६ सेल्सिअस इतके होते. अर्थात स्पेससूटमधून थंड हवा खेळवून अंतराळवीरांच्या शरीराचे तापमान कमी राखले जाते. प्राथमिक वैद्यकीय परीक्षणानंतर हे अंतराळवीर आपल्या कुटुंबियांना भेटू शकणार असले तरी पुन्हा पृथ्वीशी जुळवून घेण्यासाठी त्यांना पुढचे अनेक आठवडे मदतीची व निगराणीची गरज लागणार आहे.**

# पोलादपूर एसटी स्थानकाचे खासगी जमिनीमध्ये अतिक्रमण





**खबरबात**
**शैलेश पालकर**

रायगड जिल्ह्याचे शेवटचे टोक असलेल्या पोलादपूर स्थानकात भरदुपारी बस गाडया लावायला जागा नसल्याने अनेक गाडया प्रवेशद्वाराद्वाराजवळ उभ्या राहतात तर अनेकदा गाडया स्थानकात न शिरता बाहेरच्या बाहेर मार्गस्थ होत असल्याचे वास्तव समोर आले आहे. या बसस्थानकाचे नव्याने काम करण्यात येणार असल्याने प्रवेशद्वाराच्या बाजूला नव्या शेडचे काम करण्यात आले आहे. परिणामी,स्थानक परिसरात धूळ उडत आहे. त्यातच नव्याने बांधण्यात आलेल्या स्वच्छतागृहाची तावदाने अद्याप काचेविनाच आहेत. त्यामुळे महिला व पुरूष प्रवाशांची कुचंबणा होत आहे. दरम्यान, स्थानिक लोकांच्या जमिनीवर या एसटी बसस्थानकाचे अतिक्रमण झाले असल्याचे वेळोवेळी जमिनमालकांच्या वारसांकडून आमसभा तसेच महसूल प्रशासनाकडे दाद मागून लक्ष वेधण्यात आले असूनही नव्याने एसटी बसस्थानकाचे बांधकाम करण्यासाठी निविदा काढून काम सुरू केल्याने न्यायालयामध्ये संबधित मालक दाद मागण्याच्या पवित्र्यात आहेत.

प्रवासीवर्गाच्या सेवेसाठी तत्पर असलेली महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटी बसेस गावागावात धावत असल्यातरी काही लांब पल्ल्याच्या गाड्या लोकल गाड्याच्या प्रमाणात धावत असल्याने प्रवासीवर्गाला नियोजित वेळेत पोहोचणे कठीण होत आहे. त्यातच पोलादपूर बसस्थानकामध्ये गाडी उभी करण्याच्या जागेअभावी वेळ वाया जात असल्याने प्रवासी वर्गाचा हिरमोड होत आहे. सणासुदीच्या काळात जादा गाडया कोकणात व मुंबई ठाणेकडे मार्गस्थ होत असतात. या गाडयांतील प्रवासी पोलादपूर स्थानकात चहा नाश्ता घेऊन पुढील प्रवासाला जात असतात. यामुळे भरदुपारी ग्रामीण भागात जाणाऱ्या स्थानिक आगाराच्या गाडयांसह इतर आगाराच्या गाडया एकाच वेळी येत असल्याने गाडया स्थानकात उभ्या करण्यासाठी अपुरी जागा असल्याने किंवा मिळेल त्याजागी गाडया लावल्याने अनेक गाडया मुख्य प्रवेशद्वाराजवळ उभ्या केल्या गेल्याचे दिसून येते.

रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक ठिकाण असलेल्या व मुंबई-गोवा महामार्गावर वसलेल्या महाड आगाराचा कारभार सुरू होऊन ७१ वर्षापूर्वी विविध मार्गावर गाडया सुरू करण्यात आल्या. या वेळी महाड आगाराच्या अधिपत्याखाली माणगाव, पोलादपूर, गोरेगाव व आंबेतच्या बस स्थानकांचा समावेश होता.

माणगाव स्थानकाचे आगारात रूपांतर झाल्यानंतर महाड आगारांतर्गत फक्त पोलादपूर स्थानक आहे. मात्र, पोलादपूरचे हे स्थानक चार शेतकऱ्यांच्या जमिनीवर उभारण्यात आले असून सर्वाधिक जमीन सुंदर गणपत सोनार उर्फ पालकर यांच्या जमिनीपैकी बेकायदेशीर मालकी हस्तांतरणाने एसटी महामंडळाकडे भुमिअभिलेख विभागाच्या मिळकतपत्राने आली असल्याचे दिसून आले आहे.

या सुंदर गणपत सोनार उर्फ पालकर यांच्या मुलाच्या पानस्टॉलचा परवाना रद्द करताना महामंडळाकडे जमिनीच्या मालकीचा पुरावा नसल्याचे दिसून आले होते. यानंतर मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणावेळी शेतजमिनमालक सुंदर गणपत सोनार उर्फ पालकर यांच्या वारसाने एसटी स्थानकातील जमिनीचे भूसंपादन करण्यास तसेच एसटी महामंडळाला कोणताही मोबदला देण्यास हरकत घेताना महाड तहसिल कार्यालयांतर्गत पोलादपूरचे महालकरी यांना असे वाटते की यापुढे या चार शेतकऱ्यांच्या जमिनी बॉम्बे स्टेट ट्रान्सपोर्ट नावाने ओळखल्या जातील, असा फेरफार करून हुकूम पारित केला आहे. या जमिनीचा सातबारा उतारा केवळ फेरफाराने तत्कालीन महालकरी यांनी बॉम्बे स्टेट ट्रान्सपोर्ट च्या नावे करणे आणि सिटी सर्व्हेने या जमिनीची मालकी हस्तांतरण एस.टी.महामंडळाच्या नावे करणे असे असताना सुंदर गणपत सोनार उर्फ पालकर यांच्या वारसाने तत्कालीन महालकरी यांना मालकी हस्तांतरणाचा अधिकार नव्हता तसेच भूसंपादनावेळी या जमिनीचे भूसंपादन करण्यात येऊ नये आणि एसटी महामंडळाला भूसंपादनाचा मोबदला देऊ नये तसेच मूळ जमिनमालकांनादेखील मोबदला नकोय तर जमिनच परत पाहिजे ही भूमिका घेतल्यानंतर महाड प्रांताधिकारी यांनी ही बाब मान्य करून पोलादपूर एसटी स्थानकाच्या जमिनीपैकी चार गुंठे जमिन सुंदर गणपत सोनार उर्फ पालकर यांच्या नावे असल्याचे तसेच याप्रश्नी न्यायालयाकडे दाद मागण्याचे लेखी पत्र अपिल कर्त्या वारसाला दिले आहे.

आजतागायत एसटी महामंडळाच्या नावे सातबारा उतारा नसताना तसेच कोणताही कायदेशीर मालकी हस्तांतरणाचा पुरावा नसताना एसटी महामंडळाने पहिले बसस्थानक बेकायदेशीर असताना ते पाडून त्याच जागेवर दुसऱ्या नवीन इमारतीचे बांधकाम करणे पुर्णपणे बेकायदेशीर असल्याचे सुंदर गणपत सोनार उर्फ पालकर यांच्या वारसांचे म्हणणे आहे.

भारतातील जमिनीचे मालकी हस्तांतरण करण्याच्या कायदेशीर बाबींमध्ये आयुक्तांनादेखील अशाप्रकारे बेकायदा मालकी हस्तांतरण करण्याचा अधिकार नसल्याने पोलादपूरच्या एसटी बसस्थानकाची जमिन मूळ मालकांना हस्तांतरीत करण्याची आवश्यकता असूनही याच जमिनीवर नव्याने बसस्थानकाची इमारत बांधण्यात येण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन ठेकेदारामार्फत तोडकाम सुरू झाले आहे. पोलादपूर एसटी बसस्थानकामध्ये रत्नागिरी, आंबेजोगाई, कोल्हापूर, अक्कलकोट, तुळजापूर, मुंबई, पुणे, साताराकडे जाणाऱ्या गाडयांचे प्रवासी येत असतात.

पोलादपूर स्थानकासमोरील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण अंडरपास बॉक्स कटींग पध्दतीने जमिनीखालून ३२ फूट खोल झाल्याने असंख्य गाडयांना सर्व्हिस रोडवरून पुन्हा महामार्गावर जावे लागत असून स्थानकासमोरील पाच पुलांपैकी दोन पुलांवर एसटी गाडयांमुळे सर्व्हिसरोड बंद होऊन वाहतुकीचा खोळंबा होण्याचा प्रकार दिवसांतून अनेकदा होत असल्याचे दिसून आले आहे.

शिमगोत्सव काळात पोलादपूर एसटी बसस्थानकाच्या आवारामध्ये बसेस थांबण्यासाठी जागा अपुरी पडत असल्याचे दैनंदिन दृश्य असताना या स्थानकाचे अन्यत्र कायदेशीर भूसंपादन करून बांधकाम करण्याऐवजी अतिक्रमणकारी बांधकामाच्या जागीच पुन्हा वाढीव इमारत बांधून अतिक्रमणविस्तार करण्याचे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे धोरण कितपत लोककल्याणकारी ठरणार हा प्रश्नच आहे

## बदलते तंत्रज्ञान

# देवगड हापूस ओळखण्यासाठी आधुनिक प्रणालीचा वापर

देवगड हापूस आंब्याच्या नावाने बाजारात मोठ्या प्रमाणात बनावट आंब्यांची विक्री केली जाते. ग्राहंकाची फसवणूक रोखण्यासाठी आता प्रत्येक देवगड हापूस आंब्याला 'टँपर-प्रूफ यूआयडी सील' (टी. पी. सील यूआयडी) सक्तीचे करण्याचा निर्णय देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने घेतला आहे.



'आंब्यावर लावलेल्या टी. पी. सील यूआयडी कोडवरून खरा देवगड हापूस ओळखता येणार आहे. भौगोलिक मानांकन (जीआय) नोंदणी असलेल्या शेतकऱ्यांनाही या तंत्रज्ञानाचा फायदा होईल.'

'देवगड तालुक्यातील आंबा उत्पादक सहकारी संस्थेतर्फे जीआय नोंदणी असलेल्या शेतकऱ्यांना झाडांची संख्या आणि उत्पादन क्षमतेनुसार टी. पी. सील यूआयडी स्टिकर्सचे वितरण करण्यात आले आहे. या प्रणालीत शेतकऱ्यांनी बाजारात पाठविलेल्या प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर हा यूआयडी स्टिकर लावणे बंधनकारक असेल

- खरेदी करत असलेला आंबा देवगड हापूसच आहे का, हे तपासण्यासाठी ग्राहकांना ९१६७६६८८९९ या व्हॉट्सप क्रमांकावर आंब्यावर असलेल्या स्टिकरचा फोटो पाठवावा लागेल.प्रत्येक स्टिकर दोन भागांत विभागलेले असून, यूआयडी कोडचा एक भाग स्टिकरच्या वर आणि दुसरा भाग स्टिकरच्या खाली दिसेल.

स्टिकरवर असलेला कोड स्वयंचलित प्रणालीच्या माध्यमातून वाचला जातो. ही प्रणाली ग्राहकाला स्टिकरच्या मागे असलेल्या क्रमांकाची मागणी करते. त्यानंतर जर ग्राहकाने दिलेला क्रमांक प्रणालीत असलेल्या यूआयडी कोडशी जुळला, तर स्टिकर असलेला आंबाच खरा देवगड हापूस असल्याचे प्रमाणित होईल.

जीआय नोंदणी शिवाय आणि युआयडी स्टीकर असल्याशिवाय देवगड हापूस च्या नावाने विक्री करताना कोणी आढळल्यास जीआय कायदा १९९९ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ च्या तरतुदींच्या अंतर्गत दखलपात्र गुन्हा आहे. जीआय नोंदणी नसलेले आणि 'टँपर प्रूफ युआयडी सील' स्टिकर नसलेले कोणीही 'देवगड हापूस' च्या नावाने विक्री करताना आढळल्यास त्यांच्या विरोधात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा इशारा संस्थेने दिला आहे.

# मराठी नवकाव्याचे प्रवर्तक बा.सी. मर्ढेकर



**निमित्त**

मराठी नवकाव्याचे प्रणेते बाळ सीताराम मर्ढेकर उर्फ बी. सी. मर्ढेकर यांचा जन्म १ डिसेंबर १९०९ रोजी झाला. सातारा जिल्ह्यातील मर्ढे हे मर्ढेकरांच्या घराण्याचे मूळगाव. मूळ आडनाव गोसावी असले तरी गावाच्या नावावरून मर्ढेकर हे आडनाव रूढ झाले. मर्ढेकरांचे प्राथमिक शिक्षण बहाद्दरपूर येथे तर माध्यमिक शिक्षण फैजपूर सावदे येथे झाले. तसेच धुळ्याच्या गरूड हायस्कूल-मध्येही त्यांचे शिक्षण झाले. पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून त्यांनी बी. ए. ची पदवी घेतली. १९३४ साली 'टाइम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्राच्या संपादकीय विभागात काही दिवस त्यांनी नोकरी केली. पुढे मात्र एलफिस्टन महाविद्यालय, ईस्माइल युसूफ कॉलेज आणि सीडन हॅम कॉलेज अशा मुंबईच्या महाविद्यालयात त्यांनी इंग्रजीचे अध्यापन केले.


सुरुवातीच्या काळात इंग्लिश भाषेचे प्राध्यापक म्हणून अल्प काळ नोकरी करून नंतर त्यांनी 'ऑल इंडिया रेडिओ'वर दीर्घ काळ नोकरी केली. कवी म्हणून मर्ढेकरांना मराठी वाङ्मयात युगप्रवर्तकाचं स्थान दिलं जातं. मर्ढेकरांनी मराठी कवितेत आशय व अभिव्यक्ती या दोन्ही अंगानी क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणले. यंत्रयुगातील गतिमानतेत माणुसकी हरपत चालल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी कवितेबरोबरच काही कादंबऱ्या आणि संगीतिकाही लिहिल्या होत्या. मर्ढेकरांचे लेखन हे युद्धोत्तर काळातील नव्या जाणिवा व नव्या युगाची जाणीव व्यक्त करणारे होते.

मर्ढेकरांच्या शिशिरागम ह्या पहिल्या काव्यसंग्रहातील कवितांवर रविकिरण मंडळाचीविशेषतः त्यातील माधव ज्यूलियन् ह्यांचीछाया दिसून येते. तथापि काही कविता आणि आणखी काही कविता ह्या दोन संग्रहांच्या शीर्षकांप्रमाणेच त्यांतील कविताही वेगळ्या आहेत. अनेक पूर्वसूरींचे संस्कार पचवून त्यांतून स्वतःच्या कवितेचे अस्सल रसायन त्यांनी तयार केले आहे. जोष, ठसठशीतपणा, पुरूषी थाट आणि निर्भीडपणा ही ह्या कवितेची काही वैशिष्ट्ये रामदासांकडून आलेली आहेत. तर शब्दांची मोडतोड, प्रतिमांची जुळवाजुळव, धक्का देणाऱ्या दोन विभिन्न कल्पनांची सांगड घालणे, ह्या गोष्टी हॉपकिन्झ, टी.एस. एलियट ह्यांसारख्या कवींशी त्यांचा जवळचा संबंध दर्शवणाऱ्या आहेत.

मर्ढेकरांच्या कवितेतून निराशा व वैफल्य प्रगट होते बा.सी. मर्ढेकर हे भाषा प्रभू होते. त्यांच्या काव्यात आशय आणि अभिव्यक्ती यांचा सुसंवाद आढळतो. परंपरागत सांकेतिक उपमान व प्रतिमा न वापरता त्यांनी नव्या प्रतिमांचा उपयोग केला त्याचबरोबर ते आपल्या अनुभूतींशी प्रामाणिक राहीले. मर्ढेकरांचे काव्य वेदनेचे काव्य आहे. बा.सी.मर्ढेकर हे मराठीतील नवकवितेचे आद्य प्रवर्तक म्हणून ओळ्खले जातात. केशवसुतांनंतरचे मराठीतील एक युगप्रवर्तक कवी म्हणूनही त्यांचा उल्लेख केला जातो.

रात्रीचा दिवस, तांबडी माती, पाणी यांसारख्या त्यांच्या कादंबऱ्यासुद्धा प्रसिद्ध आहेत. तसंच त्यांचं 'नटश्रेष्ठ' हे नाटकही प्रसिद्ध आहे. त्यांना १९५६ सालचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता. २० मार्च १९५६ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# तूपाचे कमी सेवन हृदयासाठी आणि आतड्यांसाठीही चांगले

तूप हे आपल्या आहारातील महत्त्वाचा पदार्थ आहे. तुपाच्या सेवनाचे आरोग्यासाठी अनेक फायदे आहेत.



तूप हे एक अद्वितीय, पौष्टिकतेने समृद्ध अन्न आहे, जे जाणीवपूर्वक सेवन केल्यास पचन, चयापचय व हृदयाच्या आरोग्यासदेखील मदत करते. तुप लोण्याच्या गोळ्यापासून तयार केले जाते. लोणी गरम केल्यानंतर त्यातील पाणी आणि दुधाचे घन पदार्थ काढून टाकून, शुद्ध सोनेरी फॅट्स मागे सोडले जातात. ही प्रक्रिया त्याची पौष्टिकता वाढवते, ज्यामुळे ते आवश्यक फॅटी ॲसिड, फॅट्स-विरघळणारी जीवनसत्त्वे आणि अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध होते. जास्त प्रक्रिया केलेल्या तेलांप्रमाणे, तुपात शॉर्ट-चेन व मीडियम-चेन फॅटी ॲसिड्स असतात, जी जलद ऊर्जा प्रदान करतात आणि चयापचय कार्यांना समर्थन देतात.फॅटी ॲसिड्समध्ये कार्बन साखळी असते. शॉर्ट-चेन फॅटी ॲसिड्समध्ये १-६ कार्बन अणू असतात; तर मीडियम-चेन फॅटी ॲसिडमध्ये ७-१२ कार्बन अणू असतात. न पचलेल्या कार्बोहायड्रेट्सच्या किण्वन प्रक्रियेदरम्यान आतड्यातील सूक्ष्म जीवांद्वार हे तयार केले जातात.

तूप हे ब्युटायरेटचा एक उत्कृष्ट स्रोत आहे, एक शॉर्ट-चेन फॅटी ॲसिड जे आतड्यांचे आरोग्य राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. ब्युटायरेट आतड्यांतील पेशींचे पोषण करते, पचनसंस्थेतील दाहकता कमी करते व आतड्यातील उपयुक्त जीवाणूंना साह्यभूत ठरते. ते पचन सुरळीत करण्यासदेखील मदत करते, ज्यामुळे ते विशेषतः आम्लता, पोटफुगी किंवा इरिटेबल बोवेल सिंड्रोम यांसारखे आजार असलेल्या व्यक्तींसाठी फायदेशीर ठरते. त्याव्यतिरिक्त तूप चरबी-विरघळणारे जीवनसत्त्वांचे शोषण वाढवते, ज्यामुळे शरीर आपण खात असलेल्या अन्नातील पोषक घटकांचा प्रभावीपणे वापर करू शकते. जेवणासह थोडेसे तूप पाचक एंझाइम आणि पित्त उत्पादनास समर्थन देऊ शकते, ज्यामुळे पचन सुधारते. त्यामुळे तृप्तता मिळते आणि भूक कमी होते. कमी प्रमाणात तुपाचे सेवन केल्यास ते हृदयरोगास कारणीभूत ठरत नाही. तर,तुपाच्या अद्वितीय रचनेत संयुग्मित लिनोलिक ॲसिड समाविष्ट आहे, जे हानिकारक कोलेस्ट्रॉल किंवा कमी घनता लिपोप्रोटीन कमी करण्यास मदत करू शकते आणि चांगले कोलेस्ट्रॉल किंवा उच्च-घनता लिपोप्रोटीन वाढवते.

# पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

## मालमत्ता कर विभाग

### महानगरपालिका हद्दीतील उपयोग औद्योगिक असलेल्या थकबाकीदारांची यादी दिनांक 18 मार्च 2025 अखेर

| अनु क्र. | मालमत्ता क्र. | कर धारकाचे नाव | पत्ता | मालमत्ता कराची मागणी रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | KLS1-3- | सल्लागार कॉटन कॉर्पोरेशन | प्लॉट क्र.,कळंबोली स्टील मार्केट यार्ड,कळंबोली ,पनवेल.410218 | 21,62,33,867 |
| 2 | TLE4-79- | दिपक फर्टिलायझर्स अॅण्ड पेट्रोकेम. लि. | दीपक फर्टिलायझर अँड पेट्रोकेमिकल कार्पोरेशन ली,प्लॉट क्र.K-4, K-1, K-1PART, K-1PART-2, K2, K3, K5,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 10,31,88,458 |
| 3 | TLE2-249- | मे, मुंबई वेस्ट मॅनेजमेंट प्लॉट नं. पी- 32 | मुंबई वेस्ट मॅनेजमेंट,प्लॉट क्र.P32,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 9,57,34,734 |
| 4 | TLE4-80- | धारक-दीपक फर्टिलायझर अँड पेट्रोकेमिकल कार्पोरेशन प्रा.ली. | दीपक फर्टिलायझर अँड पेट्रोकेमिकल कार्पोरेशन ली,प्लॉट क्र.K-4, K-1, K-1PART, K-1PART-2, K2, K3, K5,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 9,04,31,749 |
| 5 | TLE2-95- | धारक ओवेन्स कॉर्निंग इंडिया लिमिटेड | ओवेन्स कॉर्निंग इंडिया लिमिटेड,प्लॉट क्र.T-28,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 8,00,45,277 |
| 6 | TLE2-174- | मे. गॅलेक्सी सरफॅक्टन प्लॉट नं. व्ही. -23/ 1 (चाळगाव ) | गॅलॅक्सी सरफॅक्टन्ट्स लिमिटेड,प्लॉट क्र.V-23,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 5,24,05,319 |
| 7 | KLS1-1- | राष्ट्रीय इस्पात निगम | राष्ट्रीय इस्पात निगम लिमिटेड,कळंबोली स्टील मार्केट यार्ड, कळंबोली, पनवेल.410218 | 4,01,02,943 |
| 8 | TLE2-159- | मे, व्ही. व्ही. एफ. लि. प्लॉट नं. व्ही. -39,40,41 | व्ही.व्ही.एफ.इंडिया लि.,प्लॉट क्र.V-41, V-40, V-39,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 3,79,85,530 |
| 9 | TLE2-164- | धारक नागरी घन कचरा प्रक्रिया व व्यवस्थापन केंद्र चाळगाव तळोजा ( डम्पिंग ग्राउंड ) | नागरी घन कचरा प्रक्रिया व व्यवस्थापन केंद्र चाळगाव तळोजा। ( डम्पिंग ग्राउंड ),प्लॉट क्र.,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 3,79,15,838 |
| 10 | KLS2-230- | धारक- बल्क सिमेंट कॉर्पोरेशन इंडिया लिमिटेड | प्लॉट क्र.,कळंबोली स्टील मार्केट यार्ड, कळंबोली, पनवेल.410218 | 3,62,27,817 |
| 11 | TLE2-154- | जिंदाल ड्रग्ज ली. | जिंदाल ड्रग्ज प्रा.ली.,प्लॉट क्र.T-22,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 3,58,46,613 |
| 12 | TLE2-200- | मे. एक्साईड इंडिया लि. प्लॉट न. टी -17 | एक्साईड इंडिया लि.,प्लॉट क्र.T-17,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 3,56,47,144 |
| 13 | TLE4-425- | धारक टी सी इ पी टी | टी सी इ पी टी ,प्लॉट क्र.OS-19,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 3,37,01,368 |
| 14 | TLE4-335- | धारक - दी पंचमहाल डिस्ट्रिक्ट को ऑप मिल्क प्रोड्युसर्स युनियन ली | दी पंचमहाल डिस्ट्रिक्ट को ऑप मिल्क प्रोड्युसर्स युनियन ली,प्लॉट क्र.6, G-24, G-23, G-22, G-21, G-20,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 3,27,43,417 |
| 15 | TLE3-30- | अलाना इनव्हेस्टमेन्ट अॅण्ड ट्रेडिंग कं. | अलाना इनव्हेस्टमेंट अँड ट्रेडिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र.M-42, M-41,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 3,23,62,109 |
| 16 | TLE4-4- | दिपक फर्टिलायझर्स | दिपक फर्टिलायझर्स,प्लॉट क्र.K-8,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 3,15,57,385 |
| 17 | TLE2-75- | व्हेनस सेफ्टी अॅण्ड हेल्थ प्रा. लि. | व्हेनस सेफ्टी अँड हेल्थ प्रा ली ,प्लॉट क्र.L-75, L-76,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 2,76,12,066 |
| 18 | TLE2-209- | मे, इम्मेसार केमिकल प्लॉट नं. टी. 3/2 | इम्मेयार केमिकल,प्लॉट क्र.T-3/2,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 2,55,45,990 |
| 19 | TLE2-247- | मे. सेल इंडिया मार्केट्स प्लॉट न. टी-5 | शेल इंडिया मार्केटस प्रा.लि.,प्लॉट क्र.T-5,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 2,41,01,263 |
| 20 | TLE2-201- | मे, असाही इंडिया ग्लास लि. प्लॉट नं. टी-16 | असाही इंडिया ग्लास लि.,प्लॉट क्र.T-16,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 2,33,14,505 |
| 21 | TLE3-19- | कॅस्टॉलरॉक फिशरीज प्रा. लि. | कॅस्टॉलरॉक फिशरीज प्रा. लि.,प्लॉट क्र.M-33/1, M-33,सेक्टर क्र. 3 तळोजा आद्यागिक क्षेत्र (M.I.D.C.) नोड, पनवेल | 2,18,14,615 |
| 22 | TLE1-405- | फ्लेमिंगो फार्मास्युटीकल्स | फ्लेमिंगो फर्मासिटीकल्स लिमिटेड,प्लॉट क्र.E-28,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 2,12,16,430 |
| 23 | TLE3-65- | युनायटेड ब्रेवरीज लि. | युनायटेड ब्रेव्हरीज लिमिटेड,प्लॉट क्र.M-1,सेक्टर क्र. 3 तळोजा आद्यागिक क्षेत्र (M.I.D.C.) नोड, पनवेल | 1,97,31,841 |
| 24 | TLE2-21- | धारक- ऑलस्टील | ऑलस्टील, प्लॉट क्र.L-23,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,89,95,047 |
| 25 | TLE3-3- | उल्का सी. फूड्स प्रा. लि. | उल्का सी फूड्स प्रा ली,प्लॉट क्र.M-79,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,81,74,218 |
| 26 | TLE3-49- | धारक ओवेन्स कॉर्निंग (इं) प्रा. लि. व शिल्ड प्रॉडक्ट्स | ओवेन्स कॉर्निंग (इं) प्रा. लि. व शिल्ड प्रॉडक्ट्स,प्लॉट क्र.,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,78,55,787 |
| 27 | TLE4-333- | धारक जे एम केमिकल इं प्रा ली | जे एम केमिकल इं प्रा ली,प्लॉट क्र.6A,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,74,23,044 |
| 28 | TLE3-26- | नाईक ओसियानीक एक्सस्पोर्ट्स प्रा. लि. | नाईक ओशनिक एक्सपोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र.M-5,सेक्टर क्र. 3 तळोजा आद्यागिक क्षेत्र (M.I.D.C.) नोड, पनवेल | 1,63,70,082 |
| 29 | TLE2-66- | अनिका इंटरनॅशनल प्रा. लि. | अनिका इंटरनॅशनल प्रा ली,प्लॉट क्र.L-66,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,62,56,505 |
| 30 | TLE2-136- | धारक ज्युलिएट इंडस्ट्रीज ली. | ज्युलिएट इंडस्ट्रीज ली.,प्लॉट क्र.L-111, L-110,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,53,03,784 |
| 31 | TLE2-97- | धारक मेटालुब्रिकल प्रॉडक्ट्स इंडिया प्रा ली | धारक मेटालुब्रिकल प्रॉडक्ट्स इंडिया प्रा ली ,प्लॉट क्र.T-27,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,38,52,284 |
| 32 | TLE4-340- | बामर लॉरी कंपनी | बामर लॉरी अँड कंपनी ली,प्लॉट क्र.G-17, G-16, G-15,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,27,62,503 |
| 33 | TLE1-229- | धारक विनोद गोयल | एक्सेल ऑटो विस्टा प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र.9,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,26,18,513 |
| 34 | TLE3-1- | लिंडे इंडिया लि. | लिंडे इंडिया लि.,प्लॉट क्र.T-8,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,23,93,683 |
| 35 | TLE2-5- | शहा ब्रदर्स इस्पात प्रा. लि. | शहा अँड ब्रदर्स इस्पात प्रा.लि.,प्लॉट क्र.L-5,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,21,13,258 |
| 36 | TLE4-345- | वॉलरेक मोड्यूलर सिस्टीम | वॉलरेक मोड्यूलर सिस्टीम,प्लॉट क्र.G-13/4,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,20,45,383 |
| 37 | TLE2-172- | मे. वेदांत डायस्टफ प्लॉट न. व्ही-28,29 | वेदांत डायस्टफ्स इंटरमीडिएट प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र.V-29, V-28,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,20,31,285 |
| 38 | TLE3-39- | बशीर अॅण्ड वसी फिश कं. प्रा. लि. | बशीर अँड वशी फिश कं. प्रा. ली.,प्लॉट क्र.M-65, M-66,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,19,59,025 |
| 39 | TLE4-5- | दिपक फर्टिलायझर्स | दिपक फर्टिलायझर्स,प्लॉट क्र.K-7,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,17,75,978 |
| 40 | TLE4-336- | हिंदुस्थान युनिलिव्हर ली | हिंदुस्थान युनिलिव्हर ली,प्लॉट क्र.6,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,17,74,173 |
| 41 | TLE3-5- | नाईक फ्रोजन फुड्स | नाईक फ्रोझन फूड्स प्रा ली,प्लॉट क्र.M-9, M-10,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,11,67,007 |
| 42 | TLE3-29- | धारक अलाना इनव्हेस्टमेंट अँड ट्रेडिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड | अलाना इनव्हेस्टमेंट अँड ट्रेडिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र.M-2,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,08,00,533 |
| 43 | TLE4-334- | धारक जे एम केमिकल इं प्रा ली | जे एम केमिकल इं प्रा ली,प्लॉट क्र.6A,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,07,47,183 |
| 44 | TLE1-218- | क्रिष्णा शिट्स प्रोसेसर्स | कृष्णा ◌िशिट प्रोसेसर्स प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र.C-26,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,07,07,183 |
| 45 | TLE3-31- | सोनिया मरीन एक्स्पोर्ट्स प्रा. लि. | सोनिया फिशरीज प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र.M-40,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 1,03,47,992 |
| 46 | TLE1-410- | हिंदुस्तान कॉपर लि. | हिंदुस्तान कॉपर लिमिटेड,प्लॉट क्र.E-33 ते 36,सेक्टर क्र. 1 तळोजा आद्यागिक क्षेत्र एम.आय.डी.सी. , पनवेल.410208 | 1,00,26,394 |
| 47 | TLE2-72- | ब्लू फीन फ्रोजन फूड्स प्रा. लि. | ब्लु फिन फ्रोजन फूड्स प्रा ली ,प्लॉट क्र.L-72,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 97,61,652 |
| 48 | TLE1-6- | धारक आदित्य बिर्ला सायन्स अँड टेक्नॉलॉजी कंपनी लिमिटेड | आदित्य बिर्ला सायन्स अँड टेक्नॉलॉजी कंपनी लिमिटेड,प्लॉट क्र.1, 1-A1,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 97,10,214 |
| 49 | TLE1-425- | धारक सनवेटर स्टील्स लिमिटेड तर्फे डायरेक्टर श्री ऋषी बन्सल | प्लॉट क्र.,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 95,14,176 |
| 50 | TLE4-338- | कॅमपॅक्स केमि. प्रा. लि. | केमस्पेक केमिकल प्रा ली,प्लॉट क्र.3-B,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 94,46,391 |
| 51 | TLE4-474- | धारक बालाजी ऍग्रो फ्रुट्स | बालाजी आग्रो फ्रुट्स,प्लॉट क्र.17/21,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 93,91,219 |
| 52 | TLE1-217- | धारक अशरफ हुसेन चितवाने | झराक स्टील्स प्रा. लिमीटेड,प्लॉट क्र.C-25,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 93,15,997 |
| 53 | TLE1-220- | भारत कोच बिल्डर्स | भारत कोच बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र.C-28,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 92,74,500 |
| 54 | TLE2-175- | मे, अॅरोफ्लॅक्स इंडस्ट्रिज लि. प्लॉट नं. 41,42/13,14,18 | एरोफ्लेक्स इंडस्ट्रीज लि.,प्लॉट क्र.,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 91,89,149 |
| 55 | TLE2-61- | जस्मिनो पॉलिमर टेक | जस्मिनो पॉलिमर टेक प्रा ली ,प्लॉट क्र.L-61,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 91,78,514 |
| 56 | TLE1-110- | धारक - जॉन क्रॉकेरील इंडिया लि. | जॉन क्रॉकेरील इंडिया लि.,प्लॉट क्र.A-84-2/3, A-16,सेक्टर क्र. 1 तळोजा आद्यागिक क्षेत्र (M.I.D.C.) नोड, पनवेल | 90,87,931 |
| 57 | TLE2-31- | व्हेनस सेफ्टी अॅण्ड हेल्थ प्रा. लि. | व्हेनस सेफ्टी अँड हेल्थ प्रा ली ,प्लॉट क्र.L-17,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 89,98,577 |
| 58 | TLE3-22- | संचिता मरीन प्रो. प्रा. ली. | संचिता मरीन प्रोडक्ट्स प्रा. लि.,प्लॉट क्र.M-11,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 88,74,616 |
| 59 | TLE2-147- | मे. बी. ओ. सी. (लिंडे) | बी.ओ.सी.इ.(लिंडे),प्लॉट क्र.T-25,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 88,44,073 |
| 60 | TLE4-593- | जिन्दाल लॅब्स प्रा. लि. | व्ही.के.जिंदाल कोका प्रा.लि.,प्लॉट क्र.111,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 87,78,824 |
| 61 | TLE4-14- | टायमोडींग मॅन्युफॅक्चरर्स | टायमोडींग मॅन्युफॅक्चर्स,प्लॉट क्र.W-229G,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 85,78,424 |
| 62 | TLE2-92- | अॅडव्हान्स प्रिकास्ट प्राड. प्रा. लि. | अँडव्हान्स प्रिकास्ट प्रॉडक्ट्स ली ,प्लॉट क्र.L-143,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 85,57,582 |
| 63 | TLE3-64- | मिकी एक्स्पोर्ट्स इंटरनॅशनल | मिकी एक्सपोर्ट्स इंटरनॅशनल,प्लॉट क्र.M-43,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 84,77,160 |
| 64 | TLE3-18- | उल्का सी. फूड्स प्रा. लि. | उल्का सी फूड्स प्रा.ली.,प्लॉट क्र.M-35, M-34/2,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 84,52,472 |
| 65 | TLE1-216- | इगल स्टील | ईगल स्टील रोलिंग मिल्स प्रा. लिमीटेड,प्लॉट क्र.C-24,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 83,50,058 |
| 66 | TLE3-32- | सोनिया फिशरीज प्रा. लि. | सोनिया फिशरीज प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र.M-39,सेक्टर क्र. 3 तळोजा आद्यागिक क्षेत्र (M.I.D.C.) नोड, पनवेल | 83,27,320 |
| 67 | TLE4-500- | धारक अल्ट्राटेक इंडिया लिमिटेड | अल्ट्राटेक इंडिया लिमिटेड,प्लॉट क्र.26, 25, 24,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 82,23,029 |
| 68 | KLS2-227- | महाराष्ट्र स्टेट को ऑफ मार्केटिंग फेडरेशन वि. मुंबई | महाराष्ट्र स्टेट को. ऑफ मार्केटींग फेडरेशन लि. मुंबई ,कळंबोली स्टील मार्केट यार्ड, कळंबोली, पनवेल.410218 | 81,86,991 |
| 69 | TLE2-74- | रजत वायर्स प्रा. लि. | रजत वायर्स प्रा ली ,प्लॉट क्र.L-74,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 81,58,503 |
| 70 | TLE3-9- | अलतामस एक्स्पोर्ट्स प्रा. लि. | अल-तमश एक्सपोर्टस प्रा ली,प्लॉट क्र.M-19,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 81,50,113 |
| 71 | TLE1-396- | नायका इंजिनिअरींग | नायका इंजिनिअरिंग,प्लॉट क्र.E-4,सेक्टर क्र. 1 तळोजा आद्यागिक क्षेत्र एम.आय.डी.सी. , पनवेल.410208 | 80,13,689 |
| 72 | TLE1-369- | हेल्थ सेक्युअर फार्मासेटीकल इंडिया | सीमा शुल्क बंधूआ भाडागार हेल्थ सेक्युकर फामा सेंटिकल इंडिया,प्लॉट क्र.E-15,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 78,28,809 |
| 73 | TLE3-35- | नानक न्यूट्रेशन फूड्स तळोजा प्रा. लि. | प्लॉट क्र.M-57,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 77,37,784 |
| 74 | TLE2-153-86 | धारक - मे. एस के.एम स्टील्स लि. तर्फे डायरेक्टर अमीत के शाह . . | प्लॉट क्र.A1,सेक्टर क्र. 2 तळोजा आद्यागिक क्षेत्र एम.आय.डी.सी. , पनवेल.410208 | 76,53,158 |
| 75 | TLE3-23- | संचिता फ्रोजन फूड्स प्रा. लि. | संचिता फ्रोजन फूड्स प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र.M-7/A,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 76,10,816 |
| 76 | TLE2-246- | मे, टेकनोवा इमेजिंग सिस्टमस प्लॉट नं. टी.-4 | टेक्नोवा इमेजिंग सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र.T-4,सेक्टर क्र. 2 तळोजा आद्यागिक क्षेत्र एम.आय.डी.सी. , पनवेल.410208 | 75,45,147 |
| 77 | TLE2-250- | धारक मुंबई वेस्ट मॅनेजमेंट | मुंबई वेस्ट मॅनेजमेंट,प्लॉट क्र.,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 73,56,786 |
| 78 | TLE2-94- | शिमनित किवालाईत प्रा. लि. | सिमनीत किवालाईत प्रा ली ,प्लॉट क्र.L-144,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 70,75,797 |
| 79 | TLE1-13- | परमशक्ती स्टील | गोपानी आयरन आणि स्टील परमसिद्धी स्टील,प्लॉट क्र.A-5,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 70,42,344 |
| 80 | TLE2-165- | धारक - मे. हुहतमकी इंडिया लिमिटेड | प्लॉट क्र.V-26,सेक्टर क्र. 2 तळोजा आद्यागिक क्षेत्र (M.I.D.C.) नोड, पनवेल | 68,64,786 |
| 81 | TLE1-227- | इन्फा इंजिनिअरींग | इन्फा इंजीनियर्स प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र.15,15A,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 68,19,977 |
| 82 | TLE1-357- | टीन युवान इंडिया | जिंदाल डक्स प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र.D-19,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 66,76,451 |
| 83 | TLE4-3- | दिपक नायट्रेट लि. | दीपक नायट्राईट लिमिटेड,प्लॉट क्र.K-9, K-10,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 63,46,995 |
| 84 | TLE2-91- | धारक सुनील फोरजिंग अँड स्टील इंडस्ट्रीज युनिट 2 | सुनील फोरजिंग अँड स्टील इंडस्ट्रीज,प्लॉट क्र.L-141, L-142,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 63,44,734 |
| 85 | KM1-11- | डिप्सी केमिकल प्रा लि | डिप्सी केमिकल्स प्रा. ली.,प्लॉट क्र.230, 231, 234,सेक्टर क्र. 1 कामोठे, पनवेल.410209 | 62,82,644 |
| 86 | TLE4-499- | धारक अल्ट्राटेक इंडिया प्रा. लिमिटेड | अल्ट्राटेक इंडिया प्रा. लिमिटेड,प्लॉट क्र.OS-10,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 62,76,071 |
| 87 | TLE4-364- | धारक फोम होम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड | फोम होम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र.H-31,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 62,22,740 |
| 88 | TLE1-420- | धारक भरत दत्तात्रय पाटील | प्लॉट क्र.,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 61,72,050 |
| 89 | TLE1-219- | ओनवे इंडस्ट्रीज | ऑन वे इंडस्ट्रीज लिमिटेड,प्लॉट क्र.C-27,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 60,21,190 |
| 90 | TLE4-429- | धारक आर्च फार्मा लॅब लिमिटेड | आर्च फार्मा लॅब लिमिटेड,प्लॉट क्र.,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 60,19,387 |
| 91 | TLE3-7- | डॉल्फीन मरीन फूड्स | डॉल्फिन मरीन फूड्स अॅन्ड प्रोसेसर्स प्रा.लि.,प्लॉट क्र.M-13,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 59,83,259 |
| 92 | TLE1-215- | ब्लुम इंडस्टीज | ऐंजल स्टील प्रोसेसिंग,प्लॉट क्र.C-23/2,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 59,24,205 |
| 93 | TLE4-389- | बेसिक केमिकल्स | बेसिक केमिकल्स,प्लॉट क्र.H-8, H-7,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 59,20,468 |
| 94 | TLE4-328- | अॅप्कोटेक्स इंडस्ट्रीज | अँप्कोटेक्स इंडस्ट्रीज ली,प्लॉट क्र.3/1,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 58,37,543 |
| 95 | TLE1-268- | गॅमन इंडिया प्रा. लि. | गॅमन इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर्स प्रायव्हेट लिमिटेडड,प्लॉट क्र.7,7A,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 57,78,421 |
| 96 | TLE1-423- | धारक रामदास शेवाणे | प्लॉट क्र.,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 57,47,475 |
| 97 | TLE4-254- | धारक कैरव केमोफार्बे इंडस्ट्रीज प्रा ली | कैरव केमोफार्बे इंडस्ट्रीज प्रा ली,प्लॉट क्र.J-78,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 57,45,224 |
| 98 | TLE3-25- | एम. के. ओव्हरसिज | एम के ओव्हरसिज प्रा. लि.,प्लॉट क्र.M-6,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 55,76,599 |
| 99 | TLE2-77- | जय इन्स्ट्रुमेंट्स अॅण्ड सिस्टीम प्रा. लि. | जय इन्स्ट्रूमेंट्स अँड सिस्टिम्स प्रा ली ,प्लॉट क्र.L-80,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी.,पनवेल.410208 | 55,68,052 |
| 100 | KLS1-755- | धारक- बेस्ट रोडवेज | बेस्ट रोडवेज ,प्लॉट क्र.730,कळंबोली स्टील मार्केट यार्ड, कळंबोली, पनवेल.410218 | 54,37,005 |

दिनांक १८/०३/२०२५ पर्यंतची प्रसिध्द केलेल्या मालमत्ता धारकांनी थकबाकीसह कर व इतर दंड सदर जाहीर सुचना प्रसिध्दीच्या दिनांकापासून ५ दिवसांच्या आत भरणे आवश्यक आहे. जे थकबाकीदार विहीत मुदतीत मालमत्ता कराचा भरणा करणार नाहीत त्यांच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान ८ नियम ४२ ते ४७ अन्वये वॉरंट (अधिपत्र) काढून संबंधितांच्या स्थावर मालमत्ता अटकावणी करुन ती जाहिर लिलावाव्दारे लिलाव करुन वसुल करणेत येईल. तसेच, नोटीस फी, वॉरंट फी, पेपर नोटीस फी इत्यादी थकीत मालमत्ता धारकाच्या बिलामध्ये समाविष्ट करुन वसुल करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच, इतर मालमत्तांचा लिलाव करणेत येईल याची मालमत्ता धारकांनी नोंद घ्यावी. तसेच, मालमत्ता कर भरणा केला असल्यास त्याची पावती मालमत्ता कर विभाग /प्रभाग कार्यालयात सादर करावी.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५
प्र.क्र.११३/११३/२०२५
दिनांक:१९/०३/२०२५

**सही/-**
**उपायुक्त (कर)**
**पनवेल महानगरपालिका**



# नवी मुंबई पालिकेत प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करा

## आमदार मंदा म्हात्रेंची अधिवेशनात लक्षवेधी; शासनाकडून सकारात्मक उत्तर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिका आस्थापनेत गेल्या १५ वर्षांपासून काम करीत असलेल्या स्थानिक प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यात यावे या मागणीसाठी मुंबई येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार मंदा म्हात्रे यांनी लक्षवेधीमार्फत शासनाचे लक्ष वेधले.




आमदार म्हात्रे यांनी प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी करण्यासंदर्भात शासन दरबारी पाठपुरावा करत सदरचा प्रश्न शासनाच्या पटलावर आणला. नवी मुंबई प्रकल्पग्रस्त कर्मचारी करार पद्धतीवर सहा महिन्यांच्या नियुक्ती आदेशाने किमान वेतनावर गेल्या १५ वर्षांपासून अविरत सेवा बजावीत आहेत. बहुतांश कर्मचाऱ्यांचे इतर ठिकाणी नोकरी करण्याचे वयदेखील निघून गेले आहे.

रायगड जिल्ह्यातील बारवी धरणग्रस्त कर्मचाऱ्यांची विशेष बाब म्हणून नवी मुंबई पालिकेमध्ये थेट नियुक्ती केली गेली. त्याच धर्तीवर नवी मुंबईतील स्थानिक प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांनाही कायमस्वरूपी करण्यात यावे, असे आमदार म्हात्रे यांनी लक्षवेधीवरून निदर्शनास आणले. आमदार म्हात्रे यांच्या लक्षवेधीवरील मागणीला मंत्री गणेश नाईक यांनीदेखील पाठिंबा देत सांगितले की, आमदार म्हात्रे यांनी केलेली मागणी रास्त आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबतच्या बैठकीत दिलेले आदेश पारित झाले पाहिजे होते, मात्र अद्याप ते का होत नाहीत, असा सवालदेखील त्यांनी उपस्थित केला.

या लक्षवेधीवर मंत्री उदय सामंत यांनी सांगितले की, बारवी धरण प्रकल्पग्रस्थांना नवी मुंबई महापालिकेत प्राधान्य देऊन कायमस्वरूपी केले आहे, त्याच धर्तीवर नवी मुंबई महापालिकेतील स्थानिक प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना खास बाब म्हणून शासन निर्णय काढून कायमस्वरूपी करण्यात येईल. याबाबत ज्या काही त्रुटी असतील त्या लवकरत लवकर दुरुस्त करून हा प्रश्न मार्गी लावू. १६४ स्थानिक प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना कायस्वरूपी करण्या संदर्भात योग्य ती कारवाई करण्यात येईल.

# ट्रकमधील ओव्हरहाईट माल रस्त्यावर; चालकाचा बेजबाबदारपणा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कोन-सावळा मार्गावरील नारपोली या वळणाच्या उतरावर ट्रक ड्रायव्हरने बेजबाबदारपणे ओव्हर हाईटचा माल भरल्याने तो वळणावर तोल जाऊन रस्त्याच्या मधोमध पडल्याने अपघात होता होता वाचला.

पडलेला माल खराब न व्हावा म्हणून त्याने वाहन बाजूला न घेता बिनदास पणे मधोमध उभा ठेवला. त्यामुळे एकीकडून चढ व दुसरीकडून उतार असलेल्या वळण रस्त्यावर अनेक प्रवासी वाहन धारणकांचा ट्रक ड्रायव्हरने एक तास जीव धोक्यात ठेवला होता. ओव्हर हाईट साठीच्या तुटपुंज्या दंडात बिनदासपणे वाहन कायदा मोडणारे ट्रान्सपोर्ट कर्मचारी



मुळे रस्त्यावर आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्याठिकाणी भर रस्त्यावर धोकादायक असे वळण असतानाही कायद्याची व सुरक्षितेची परवा न करता निवांतपणे रस्ता अडवून हमाल आणण्यासाठी गेलेला ड्राइवर म्हणजे प्रवाश्यांसाठी मृत्यू घंटाच चालू होती, असे ड्राइवर असुरक्षित प्रवास करून कोणाचा जीव घेईल या बाबतीत चिंता वाटावी, अशी माहिती ड्राइवरच्या सहाय्यकाने दिली.

ड्राइव्हर, ट्रान्सपोर्टर व कंपनीचा बेजवाबदारपणा म्हणजे कमी पैशात जास्त माल वाहतूक करण्यासाठी केलेल्या या ओव्हर हाईटच्या उपायोजना यावर कोन ट्रॅफिक वाहतूक नियंत्रण विभागाकडे तक्रार करण्यात आली.

# आजपासून वाशीत नव तेजस्विनी महोत्सव

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविम) सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांच्या विक्रीसाठी नव तेजस्विनी महोत्सव २०२५ हा भव्य प्रदर्शन व विक्री मेळावा महिला आर्थिक विकास महामंडळ मार्फत गुरुवार २० ते मंगळवार २० मार्च, २०२५ दरम्यान सिडको एक्झिबिशन सेंटर, वाशी, नवी मुंबई येथे आयोजीत करण्यात आला आहे, अशी माहिती महिला आर्थिक विकास महामंडळाने दिली आहे.

या भव्य प्रदर्शन व विक्री मेळाव्यात महाराष्ट्रातील १४० पेक्षा जास्त स्टॉल्स सहभागी होणार आहेत. विविध जिल्ह्यांतील महिला बचतगटांनी तयार केलेली उत्कृष्ट उत्पादने प्रदर्शित केली जाणार आहेत. हस्तकला, बांबू उत्पादने, हामतग वस्त्रप्रकार, पारंपरिक ग्रामीण उत्पादने यासारख्या विविध उत्पादनांचा आनंद या प्रदर्शनात घेता येणार आहे. खवैयांसाठी ग्रामीण शेतकरी महिला गटांद्वारे तयार केलेले खास परंपरिक पदार्थ उपलब्ध होणार आहेत.

या महोत्सवाच्या उद्घटन समारंभाला मान्यवर उपस्थित राहणार असून, विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी हे प्रदर्शन एक उत्तम व्यासपीठ ठरणार असून, महिला बचतगटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि महिलांच्या आर्थिक स्वयंपूर्णतेला चानला देण्यासाठी माविम सुवर्ण महोत्सव नव तेजस्विनी २०२५ हा एक महत्त्वाचा उपक्रम ठरणार आहे.

या प्रदर्शनाला नागरीकांनी आवर्जून भेट द्यावी तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून येणाऱ्या महिलांच्या कुशल हातांनी तयार केलेल्या साहित्य व वस्तुंची खरेदी करावी, असे आवाहन महिला आर्थिक विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक महेंद्र गमरे यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

# गृहनिर्माण संस्थांना ताळेबंद सादर करण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, नियम आणि उपविधीनुसार सहकारी वर्ष संपल्यावर उपविधी क्र. १४६ (अ) नुसार ४५ दिवसांच्या आत मागील सहकारी वर्षाचे प्राप्ती व प्रदान विवरणपत्र, उत्पन्न व खर्च विवरणपत्र, तसेच वर्ष अखेरच्या दिवसांचा ताळेबंद तयार करणे गृहनिर्माण संस्थाना बंधनकारक आहे. याबाबत नवी मुंबई कोपरेटीव्ह फेडरेशनने सर्व गृहनिर्माण संस्थांना आवाहन केले आहे.

दरम्यान, कोणत्याही गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना काही शंका असल्यास त्यांनी भास्कर म्हात्रे, सचिव नवी मुंबई को ऑप हौसिंग फेडरेशन लि. यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन नवी मुंबई फेडरेशन द्वारे करण्यात आले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८१ (१) (अ) नुसार ३१ जुलै पर्यंत लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. आदर्श उपविधी क्रमांक १४६ (व) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वार्षिक विवरण ३० सप्टेंबर पूर्वी निबंधकास सादर करणे अनिवार्य आहे. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेने नियुक्ती केलेल्या राज्यशासनाने मान्यता दिलेल्या नामिकेतील लेखापरीक्षक किंवा लेखापरीक्षण करणाऱ्या व्यवसाय संस्थेचे नाव आणि त्यांची लेखी संमती असलेल्या विवरणपत्र वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक आहे. लेखापरीक्षकाकडून अहवाल आल्यानंतर संस्थेच्या सचिवाने ओ नमुन्यात दोष दुरुस्ती अहवालाचा मसुदा तयार करून तो प्राप्त झाल्याच्या तारखेच्या लगतनंतर भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी करावयाचा आहे. समिती लेखापरीक्षण दुरुस्ती अहवाल निबंधाकडे आणि वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे सदर करेल.

संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दरवर्षी ३० सप्टेंबर रोजी किंवा तत्पूर्वी अधिनियमातील कलम ७५ (१) खाली तरतूद केल्याप्रमाणे भरविली पाहिजे. जर सभा विहित केलेल्या मुदतीत बोलाविण्यात कसुर करण्यात आली तर अधिनियमाच्या कलम ७५ (५) नुसार निरर्थक ठरविण्यात येईल व कारवाई होऊ शकेल. त्यामुळे सर्व गृहनिर्माण संस्थांनी संस्थेवर निबंधक कार्लायाकडून कारवाई होऊ नये म्हणून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, नियम, आणि आदर्श उपविधी नुसार लेखापरीक्षण आणि वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याची गरज आहे.

# 'हिरानंदानी'त महिलांना स्वसंरक्षणाचे धडे

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महिला दिनाचे औचित्य साधून व ५४वा सेफ्टी विक क्लोजिंग सेरेमनी या कार्यक्रमा निमित्याने योटा डाटा सेंटर NM1DC रसायनीतील हीरानंदनी भोकरपाडा येथे महिला कर्मचाऱ्यांसाठी विशेष स्वसंरक्षणार्थ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये तायक्वांदो या खेळाचे महिलांसाठी सेल्फडिफेन्स वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या सेशनमध्ये आपल्या परिसरातील तुराडे येथील रायगड भूषण सचिन माळी आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक व राष्ट्रीय पंच रायगड जिल्हा सचिव यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनी मधील नामवंत अकॅडमी अटॅकर तायक्वांदो अकॅडमी यांनी विशेष सत्रामध्ये महिला कर्मचाऱ्यांना स्वसंरक्षणार्थ व तायक्वांदो या खेळाचे महत्त्व सांगून पुढील कार्यक्रम झाला.

यामध्ये महिला कर्मचाऱ्यांना स्वतःचे संरक्षण कसे केले जाते व कसे करावे याबद्दल विविध टेक्निक्स दाखवून त्यांना याबाबत मार्गदर्शन झाले या कार्यक्रमानंतर महिला कर्मचाऱ्यांनी सचिन माळी सरांचे आभार मानून त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला तसेच येथील योटा डाटा सेंटरचे हेच आर हेड माधुरी म्हामणकर यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की, असे मार्गदर्शन पर शिबिर हे प्रथमतः अशा एखाद्या कंपनीमध्ये आयोजित केला गेला आहे. त्यामुळे त्यांनी संपूर्ण टीमचे विशेष आभार मानले तसेच योटा डाटा सेंटरचे सेफ्टी व सिक्युरिटी हेड संभाजी नाईक, हेच आर हेड माधुरी म्हामणकर, सेफ्टी लीडर सिद्धार्थ चावरे, सिक्युरिटी लीडर अमित पवार, राजेश कांबळे यांनी हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी विशेष मेहनत घेतली.



# सतीश निकम नवी मुंबई जिल्हा निवडणूक अधिकारी

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय जनता पक्षाच्या 'संघटन पर्व' या संघटनेच्या निवडणुका दर तीन वर्षांनी घेतल्या जातात. या प्रक्रियेद्वारे बूथ पातळीपासून ते राष्ट्रीय अध्यक्षांपर्यंतच्या पदाधिकाऱ्यांना निवडले जाते आणि प्रत्येक सक्षम कार्यकर्त्यांना त्यांची क्षमता दाखवण्याची आणि कामगिरी करण्याची संधी दिली जाते. या प्रक्रियेचा एक भाग म्हणून नवी मुंबईतील सतीश निकम यांची नवी मुंबई जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

नवी मुंबईतील मंडळ स्तरापर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे. त्यामुळे येत्या काळात संघटन बांधणीला जोर येणार आहे. सतीश निकम २०१४ पासून भाजपमध्ये कार्यरत आहेत. २०२४च्या विधानसभा निवडणुकीत बेलापूर विधानसभेत भाजपचा विजय सुनिश्चित करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भाजपत राष्ट्रीय अध्यक्षांचा कार्यकाळ अधिकृतपणे मार्च २०२४मध्ये संपला आहे, परंतु लोकसभा निवडणुका पाहता, संघटनात्मक रचनेत कोणतेही बदल करण्यात आले नव्हते.

लोकसभा निवडणुकीनंतर, महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये लगेचच विधानसभेच्या निवडणुका झाल्या. ही राज्ये वगळता इतर राज्यांमध्ये ऑगस्ट २०२४मध्ये संघटनात्मक निवडणूक लगेच सुरू झाली. या दोन राज्यांमध्ये, जानेवारी २०२५ मध्ये ही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. प्रक्रियेच्या पाच टप्प्यात, प्राथमिक सदस्यांची नोंदणी करावी लागते. सक्रिय सदस्यांची नोंदणी केली जाते. त्यानंतर बूथ समित्या, मंडळ अध्यक्ष, जिल्हा अध्यक्ष, प्रदेश अध्यक्ष आणि नंतर राष्ट्रीय अध्यक्ष निवडले जाणार आहेत.

# नेरूळमध्ये सामाजिक उपक्रमांनी शिवजयंती साजरी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राजा श्री शिवछत्रपती प्रतिष्ठान यांच्यामार्फत सालाबादप्रमाणे यंदाही अर्जुन सावंत आणि चेतन मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली शिवजयंती विविध सामाजिक उपक्रम घेऊन मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.



नवी मुंबई मनपा माजी आयुक्त विजय नाहटा, भाजप युवा नेते राजू तिकोने, मनसे नवी मुंबई अध्यक्ष गजाजन काळे, शिवसेना शहर प्रमुख विजय माने यांनी शिवजयंती सोहळ्यात उपस्थित राहून शिवभक्तांना प्रोत्साहित केले.

प्रारंभी, प्रतिष्ठानच्या वतीने बेलापूर किल्ला ते नेरूळ सेक्टर १८ इथपर्यंत शिवज्योत आणण्यात आली. या वेळी आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. आरोग्य शिबिरामध्ये गरजू नागरिकांच्या मधुमेह, रक्तदाब, कोलेस्ट्रॉल आणि दंत चिकित्सा करण्यात आली.

सायंकाळी शिवकालीन वेशभूषा स्पर्धेमध्ये लहान मुलांनी उत्स्फूर्तपने सहभाग घेतला. छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, झाशीची राणी यांच्या वेशभूषा करून मुलांनी हजेरी लावली होती. वेशभूषा स्पर्धेत विजेत्या मुलांनी बक्षीसाची लयलूट केली.वेशभूषा स्पर्धे तील सहभागी मुलांना छत्रपती शिवरायांचे आत्मचरित्र पुस्तक बक्षीस म्हणून देण्यात आली. या वेळी पारंपरिक ढोल ताशा पथकांनी आपल्या कलेचे सादरीकरण केले.

या वेळी महाराष्ट्रातील हुतात्म्यांच्या पुस्तकांचे स्टॉल देखील लावण्यात आले होते. शिवजयंती सोहळ्यानंतर भोजनाचा स्वाद शिवभक्तांनी घेतला. शिवजयंती यशस्वी साजरी करण्यासाठी प्रणित सपकाळ, प्रणय साबळे, किरण खवले, अश्विन ढमाळ, रसिक काजरोळकर, सिद्धार्थ खामकर आदींनी मेहनत घेतली.



**नवी मुंबई : नेरुळ सेक्टर २मधील एलआयजी सोसायटीतील गटारावरील तुटलेल्या झाकणांची तातडीने डागडुजी करण्याची मागणी नागरिकांकडून महापालिकेकडे करण्यात येत आहे.**

# उरण महाविद्यालयात ग्राहक हक्क दिन

## आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत उपक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयांमध्ये जागतिक ग्राहक हक्क दिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. पी. आर. कारूळकर यांनी केले. विद्यार्थ्यांनी आपल्या व्यवहारिक जीवनामध्ये विक्रेत्याकडून काही फसवणूक होत असल्यास ते निमूटपणे सहन नकरता त्याच्यावरती दाद मागितली पाहिजे. ग्राहकांचे हक्क आणि जाणीव याविषयी आपण जागृत राहिले पाहिजे. कार्यक्रमाच्या प्रस्तावनेनंतर महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सरस्वती प्रार्थना गायली. महाविद्यालयाचे काही विद्यार्थी त्यामध्ये खुशी शर्मा, मोहिते तनिषा, घमरे तनवी, गुप्ता अंजली आणि चव्हाण साक्षी या विद्यार्थिनींनी जागतिक ग्राहक हक्क दिवसाच्या निमित्ताने आपली मनोगते व्यक्त केली.

मनोगते मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमधून अतिशय उत्कृष्टपणे मांडली होती. यानंतर डॉ. एच. के. जगताप यांनी



जागतिक ग्राहक हक्क दिवसाचे महत्त्व आणि आपल्या जबाबदाऱ्या याविषयी मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. जी. लोणे सर यांनी ग्राहकांची कशी फसवणूक होते, आणि ती आपण कशी टाळली पाहिजे याच्या विषयी मार्गदर्शन केले. यानंतर आयोजक आजीवन शिक्षण विभागाचे प्रमुख ज्येष्ठ प्रा. व्ही. एस. इंदुलकर यांनी आभार मानले आणि आपल्या आभार व्यक्त करताना ग्राहक, ग्राहकांच्या जबाबदाऱ्या ग्राहकांनी कोणत्या प्रकारे वस्तू खरेदी कराव्यात, होणारी आपली पिळवणूक कसे थांबवावे याविषयी जागृती होण्यासाठी अशा प्रकारचे कार्यक्रम आपण नेहमी ऐकत राहिले पाहिजे. तसेच ग्राहकांचे हक्क आणि जबाबदाऱ्या, सामाजिक जनजागृती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमामध्ये प्रा. आर. टी. ठवरे प्रा. जे.के. कोळी प्रा. हन्नत शेख, प्रा. पूजा गुप्ता, प्रा. निलोफर मॅडम इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरती पाटील या विद्यार्थिनीने सुरेख आणि उत्कृष्ट केले.

# तिथीप्रमाणे शिवजयंती उत्साहात

**उरण : बातमीदार**

श्रीमंत योगी प्रतिष्ठान वशेणी, केळवणे, तांबडशेत यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून किल्ले रायगड ते तांबडशेत, वशेणी, केळवणे अशी महाराजांची शिवज्योत ह्या तिन्ही गावात मोठ्या उत्साहात आणण्यात आली.

ही शिवज्योत आणण्यासाठी वशेणी गावचे शिवभक्त सुबोध पाटील, तांबडशेतचे कल्पेश म्हात्रे, संकेत पाटील,जयेश पाटील, केळवणेचे रंजित पाटील, गुरुनाथ गावंड, चैतन्य पाटील आदी शिवभक्तांनी प्रयत्न केले. या शिवज्योतीचे प्रत्येक गावागावात स्वागत करण्यात आले.

तिथीप्रमाणे शिवजयंती सोमवारी (दि.१७) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली, अशी माहिती पुनाडे गावचे शिवप्रेमी तथा पुनाडे गावाचे सामाजिक कार्यकर्ते देवेंद्र आत्माराम पाटील यांनी दिली.



# महाडमधील पुलांची कामे संथ गतीने

## गडावर येणाऱ्या पर्यटकांचे हाल



**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडावर जाण्यासाठी महाड पासून असलेल्या महाड रायगड मार्गाचे काम गेली तीन वर्षाहून अधिक काळ सुरू आहे. आजही या मार्गावरील लाडवली येथील पुलासह अन्य पुलांची कामे अर्धवट अवस्थेत आहेत. याचा त्रास मात्र वाहनचालक, स्थानिक नागरिक, शिवप्रेमींना होत आहे. याबाबत महामार्ग बांधकाम विभाग ठेकेदाराकडे पाठपुरावा करत असले तरी ठेकेदार हे काम संथ गतीने करत असल्याचे दिसून येत आहे.

किल्ले रायगडावर जाण्यासाठी महाडपासून सुमारे २४ किमीचा महाड रायगड मार्ग आहे. हा मार्ग यापूर्वी महामार्ग बांधकाम विभागाच्या अंतर्गत होता, मात्र काही वर्षापूर्वी हा मार्ग महामार्ग बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला. सुरवातीला या मार्गाचे काम ज्या ठेकेदाराला दिले होते त्याने या मार्गाचे काम अत्यंत संथ गतीने केले त्यामुळे या ठेकेदाराकडून हे काम काढून घेण्यात आले. सद्या या मार्गाचे काम अक्षय कन्स्ट्रक्शन या कंपनीला देण्यात आले. या कंपनीकडूनदेखील हे काम आजही सुरूच आहे. महाड पासून कोंझरपर्यंत मार्गाचे काम पूर्ण झाले असले तरी अनेक ठिकाणी पुल, मोऱ्या आणि जोड रस्त्यांची कामे अपूर्णावस्थेत आहेत. यामुळे कच्च्या रस्त्याचा आणि धुळीचा सामना स्थानिक नागरिक, शिवप्रेमींना करावा लागत आहे.

गतवर्षी महाडपासून अवघ्या तीन किमी अंतरावर असलेल्या लाडवली गावाजवळ असलेल्या उपनदीवरील पूल अपूर्ण असल्याने ऐन पावसाळ्यात याठिकाणी मार्ग बंद पडला होता. नागरिकांनी यावेळी आंदोलने केली आणि पर्यायी मार्गावर वाहतूक वळवण्यात आली होती, मात्र पूर्ण पावसाळ्यात या मार्गावर वाहतूक ठप्प झाली होती. गेली दोन वर्षांपासून याठिकाणी काम रखडलेले आहे. आजही पुलाचे काम पूर्ण झाले असले तरी जोड रस्त्यांची संरक्षक भिंत पूर्ण नसल्याने जोडरस्त्याचे काम न केल्याने आजही कच्च्या मार्गाचा त्रास सहन करावा लागत आहे.

पुलावरील कामदेखील आजही सुरू आहे. शिवाय लाडवली सह तळाशी, वाडा, वरंडोली आदी ठिकाणी पुलांची कामे अर्धवट आहेत. यामुळे धुळीचा सामना करावा लागत आहे. याबाबत स्थानिक महामार्ग बांधकाम प्रशासन मात्र ठेकेदाराच्या कामावर समाधान व्यक्त करत असून लवकरच ही कामे देखील पूर्ण करून घेतली जातील असे सांगितले जात आहे.

> **लाडवली आणि इतर ठिकाणच्या पुलांची कामे पूर्ण करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असून पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण होतील.**
>
> **–अक्षरा डहाके, सहाय्यक कार्यकारी अभियंता, महाड**

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कालावधी ११ महिन्यांचा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार क्षमता वाढविण्याकरीता सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ११ महिने करण्यास शासनाने मान्यता दिली असल्याची माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अ.मु.पवार यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत सद्यःस्थितीत जे उमेदवार कार्य प्रशिक्षण घेत आहेत, त्यांचा कार्य प्रशिक्षण कालावधी ते रुजू झाल्याच्या दिनांकापासून ११ महिने असेल. तसेच ज्या उमेदवारांच्या सहा महिन्यांचा प्रशिक्षण कालावधी या पूर्वीच पूर्ण झाला आहे अशा उमेदवारांनी पुढील पाच महिन्यांच्या प्रशिक्षणांसाठी संबंधित आस्थापनेत रुजू व्हावे. ज्या उमेदवारांचा सहा महिन्यांचा प्रशिक्षण कालावधी यापुर्वी पूर्ण झाला आहे. त्या उमेदवारांना ते रुजू झाल्याच्या दिनांकापासून पुढील पाच महिन्याच्या कालावधीसाठी कार्य प्रशिक्षणास उमेदवार करून घेता येईल.

ज्या उमेदवारांचा सहा महिन्यांचा प्रशिक्षण कालावधी यापुर्वी पुर्ण झाला आहे अशा उमेदवारांनी पुढील ५ महिन्यांच्या कालावधीसाठी ३० एप्रिल, २०२५ पूर्वी संबंधित आस्थापनेत रुजू व्हावे. या योजनेत यापूर्वी सहभागी असलेल्या खासगी आस्थापनांनी Certificate Of Incorporation/उद्यमआधार व EPF/ESIC/GST/DPIT यापैकी एक अशाप्रकारे किमान दोन प्रमाणपत्र विभागच्या http://www.cmykpy.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ३० दिवसाच्या आत सादर करावे.

या योजनेंतर्गत कार्यप्रशिक्षणसाठी यापूर्वी रुजू झालेल्या व नव्याने रुजू होणाऱ्या उमेदवाराने तो संबंधित आस्थापनेत तसेच सदर आस्थापनेशी संबंधित इतर आस्थापना / कार्यालयात यापूर्वी कधी ही कायम/तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत नसल्याबाबतचे तसेच कुठलेही हितसंबध नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रुजू होते वेळी संबंधित आस्थापनेस सादर करणे अनिवार्य राहील.

११ मार्च २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील नमूद सुचनेस अनुसरून प्रशिक्षण कालावधीमध्ये यापुढे वाढ करण्यात येणार नाही, या योजनेअंतर्गत आस्थापना/उद्योग/महामंडळामार्फत विना अनुभवी रोजगार इच्छुक पात्र उमेदवारानां संबंधित आस्थपनेत कायमस्वरूपी नोकरीचा हक्क राहणार नाही. याबत काही समस्या असल्यास या कार्यालयाचे (०२१४१-२२२०२९) व मोबाईल (९८५०४१११८७)वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# औरंगजेबाची कबर हटविण्याची मागणी

## 'विहिंप'चे मुरूड तहसीलमध्ये निवेदन

**मुरूड : प्रतिनिधी**

औरंगजेबाची कबर छत्रपती संभाजी नगर या शहरातुन काढुन टाकावी, असे लेखी निवेदन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विश्व हिंदू परिषद व बजरंग दल मुरूड प्रखंडामार्फत मुरूड तहसिलदार रोहन शिंदे यांच्याकडे देण्यात आले आहे.

या निवेदनात औरंगजेबाचे कुठलेही स्मारक अथवा कबर ही स्वतंत्र भारतात असणे ही गुलामीचे प्रतिक आहे. ही कबर काढून टाकावी, अशी विनंती करण्यात आली आहे. हे न झाल्यास पूर्व सूचित करून विश्व हिंदू परिषद व बजरंग दल हिंदू समाजासोबत छत्रपती संभाजी नगरकडे कारसेवेसाठी कूच करेल व कबर उद्ध्वस्त करेल, अशा गर्भित इशाराही दिला आहे. निवेदन विहिंप कार्यकर्ते संतोष भोईर, नारायण घाग व विहिप बजरंग दल कार्यकर्त्यांनी तहसिलदारांना सादर केले.



# आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्रात पदे रिक्त

**मुरूड : प्रतिनिधी**

आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आजू बाजूस २२ गावांची वस्ती असून येथे हे एकमेव आरोग्य केंद्र आहे. मुरूड तालुक्यातील आगरदांडा ग्रामपंचायत हद्दीतील आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवकांच्या रिक्त पदांमुळे हे आरोग्य केंद्र सलाईन वर असल्याची स्थिती निर्माण झाली आहे.



या केंद्रांतर्गत येणाऱ्या आजुबाजु गावातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणारे हे उपकेंद्र अपुऱ्या कर्मचाऱ्यांरामुळे रुग्णांना आरोग्य सेवा देताना अडचणींचा सामना करावा लागत आहे.तसेच यांच ताण आरोग्य सेविका यांच्यावर पडत आहे. आरोग्याच्या दुष्टीने महत्वाचा आरोग्य केंद्राच्या प्रतिशासन गंभीर असले तरी प्रशासन मात्र उदासीन असल्याचे चित्र दिसून येत आहे.

या गंभीर विषयाकडे जिल्हा आरोग्य विभागाने याकडे लक्ष देऊन राजपुरी, सावली, शिघ्रे, आगरदांडा, महालोर व खारअंबोली या ठिकाणीच्या उपकेंद्रातील आरोग्य सेवकांची रिक्त पदे तसेच आगरदांडा येथे आरोग्य साहिका (एल.एच.व्ही) १ पद रिक्त असुन लवकरात लवकर या पदाची नियुक्ती करावी.जेणेकरुन यांचा ताण आरोग्य सेविका व डॉक्टर वर पडणार नाही, अशी मागणी आगरदांडा परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.

> **आरोग्य सेवकांची सहा पदे रिक्त आहेत. या संदर्भात आमच्या वरिष्ठ पातळीवर पत्रव्यवहार केला आहे. लवकरच या ठिकाणी आरोग्य सेवकांची भरती होईल.**
>
> –पायल राठोड, आरोग्य अधिकारी, मुरुड

# संत तुकाराम बीज उत्साहात, वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतजवळील मुद्रे बुद्रुक गावामध्ये यंदाही संत तुकाराम महाराज बीज उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी वारकरी बंधू-भगिनींनी फुगड्या, मृदूंगाच्या तालावर पालखी मिरवणूक काढून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सकाळी संत तुकाराम महाराजांचे मूर्ती पूजन नवदांपत्य देवेंद्र व जयश्री बैलमारे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर युवकांनी संगीत भजने सादर केली. श्री भैरवनाथ मंदिरापासून फुले उधळत गावातून पालखी काढण्यात आली. महाप्रसादाने सोहळ्याची सांगता झाली.

या वेळी रमेश बैलमारे, विजय मालकर, दत्तात्रय भुईकोट, दीपक मोधळे, सोमनाथ पालकर, ज्ञानेश्वर करणूक, अंकुश मोधळे, राजेश पाटील, अरुण बैलमारे, दिलीप बैलमारे, संतोष बैलमारे, शशिकांत बैलमारे, सुमित बैलमारे, संदीपबुवा पाटील, समीर बुवा दिसले, रवींद्र मोधळे, शेखर बैलमारे, विलास दिघे यांच्यासह वारकरी, ग्रामस्थ उपस्थित होते.



# माणगावमध्ये महिला दिन; विविध कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्ष हर्षदा सुमित काळे यांच्या संकल्पनेतून प्रभाग ६ मधील महिलांना रोजच्या धाकाढाकीच्या जीवनातून थोडी मौजमजेची पर्वणी देण्यात आली.

शहरातील साई मॅग्नेट रिसॉर्ट येथे स्विमिंग, रेन डान्स व विविध खेळ यांचे यशस्वी नियोजन करण्यात आले सर्व वयोगटातील महिलांनी याचा मनमुराद आनंद लुटला. खेळ व रेन डान्स पूर्ण होताच वेळ आली लहान मुलींच्या सांस्कृतिक कार्यक्रमांची लहान मुलांनी कार्यक्रमाला एक वेगळी झळाली आणली त्यात महिलांनी गाणी भजन सादर करून आपल्यातील कलागुणांना वाव करून दिला, अगदी उत्साहात केक कापून जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम रविवारी (दि.१६) साजरा करण्यात आला.



या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून प्रभाग क्रमांक ६ मधील ज्येष्ठ कर्तृत्वान महिलांचा सत्कार करून कार्यक्रम अत्यंत साधेपणात कोणताही व्हीआयपी कल्चर न ठेवता करण्यात आला. यावेळी प्रभागातील महिलांचा सत्कार व बक्षीस प्रभागातीलच महिलांनी केला व त्यांना प्रोत्साहित केले.

कार्यक्रमांची सांगता करताना महिलांनी उपनगराध्यक्षा हर्षदा सुमित काळे यांना अनोख्या कार्यक्रमाबद्दल आभार मानत अशेच कार्यक्रम करत राहण्यासाठी मागणी केली.

# विद्यार्थ्यांनी समाजाचे ऋण कधीही विसरू नये –म्हशीलकर

**मुरूड : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी समाजाचे ऋण कधीही विसरू नये असे महत्वपूर्ण प्रतिपादन मुरुड संत रोहिदास ज्ञाती पंचायत मंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष- राजु म्हशीलकर यांनी संत रोहिदास नगर मुरूड येथे होळी उत्सवाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा समारंभ कार्यक्रमावेळी बोलत होते.



या वेळी प्रमुख पाहुणे नवी मुंबई महानगर पालिकाचे वरिष्ठ अधिकारी कुंदन पुराडकर, पोलीस उपनिरीक्षक, रेवदंडा दिपक म्हशीलकर, अध्यक्ष राजु म्हशीलकर, उपाध्यक्ष सुरेश मुरुडकर, सचिव राकेश मुरुडकर, सहसचिव संजय झिराडकर, खजिनदार प्रशांत दिवेकर, सल्लागार अभिजित चांदोरकर, सल्लागार- संदिप चांदोरकर, गाव पाटील -दिपक म्हशीलकर, महिला मंडळ अध्यक्ष तुळसा म्हशीलकर महिला बचतगट अध्यक्ष शारदा मुरुडकर, संजय पेणकर, मंगेश मुरुडकर, अंकुश मुरुडकर, दिनेश पुराडकर, नरेश पुराडकर, शैलेश म्हशीलकर, विलास मुरुडकर, दिपक पुराडकर आदिंसह समाज महिला भगिनीं बांधव व गुणवंत विद्यार्थी व मान्यवर उपस्थित होते.

या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पहिवी ते १५वीच्या विद्यार्थाना मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ तसेच सन्मान चिन्ह व प्रशिस्त पत्रक देऊन गौरविण्यात आले. तसेच महिलांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन संजय झिराटकर व आभार राजु म्हशीलकर यांनी मानले.

# खोपोलीत करवसुलीला वेग



**खोपोली : प्रतिनिधी**

मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत व २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी जास्तीतजास्त कर वसुलीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी खोपोली पालिका कडून मालमत्ता कर व पाणीपट्टी कर वसुलीची जोरदार मोहीम सुरू आहे. या वसुली मोहिमेला नागरिकांकडून ही उत्तम प्रतिसाद मिळत असून , कर भरणा करण्यासाठी पालिकेत रांगा लागत आहेत .

मार्च महिना आल्याने खोपोली पालिका कडून वर्तमान स्थितीत कर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जोरदार मोहीम सुरू आहे. एका बाजूला थकबाकीदारांना नोटीसा बजावणे , पाणी कनेक्शन खंडित करणे असे कारवाईचे हत्यार पालिका कडून राबविण्यात येत आहे. नागरिकांना कर भरणा अधिक सोपा व्हावा यासाठी शहरातील विविध रहिवासी भागात विशेष वसुली पथक नियुक्त करून कॅम्प लावून वसुली मोहीम तीव्र केली आहे. तर पालिका कार्यालयात ही पाणी पट्टी व मालमत्ता कर भरणा सुरळीत व्हावा म्हणून अतिरिक्त खिडक्या सुरू आहेत.

यात रोख रक्कम, धनादेश व डिबेड कार्ड व ऑन लाईन पध्दतीने कर भरण्यासाठी ची सुविधा निर्माण करण्यात आली आहे. दरम्यान, कोणतीही कारवाई होण्यापूर्वी कर भरण्यासाठी नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत असून कर भरण्यासाठी पालिकेत रांगा लागत आहेत.

या मोहीम अंतर्गत मागील आठ दिवसांत दररोज सरासरी दहा लाखांच्या वर कर वसुली होत असल्याचे वसुली अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान कोणतीही अप्रिय कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी तातडीने पाणीपट्टी व मालमत्ता कर भरण्याचे आवाहन मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी केले आहे.

दरम्यान वर्षोनुवर्षे थकबाकीदार असलेल्या बढया थकबाकीदार यांच्याकडून, विकसक व औद्योगिक क्षेत्रातील थकबाकीदार यांच्याकडून कर वसुली होण्यासाठी नगरपालिका कडून कडक मोहीम राबविण्यात येत असून, कर भरा अन्यथा कारवाईला सामोरे जा असा निर्वाणीचा इशारा नोटिशीनद्वारे थकबाकीदाराना देण्यात येत आहे.

# परिचारिका संघटनेची सभा

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद परिचारिका संघटना एनपीजी ३१३० शाखा-रायगड कार्यकारिणी सभा रविवारी (दि.१६) पेण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वडखळ येथे संघटनेच्या राज्याध्यक्षा मिनाक्षी मुदगल, राज्य कोषाध्यक्षा आम्रपाली गांगुर्डे, पूर्ण जिल्हा संघटक उषा सावके तसेच महासंघाचे पशुवैद्यकीय राज्यसचिव कैलास चौलकर, ग्रामसेवक संघटनेचे कार्याध्यक्ष शैलेश नाईक तसेच रायगड जिल्हा व्यवस्थापक अंकुश शेळके तसेच ग्रुप ग्राम पंचायत वडखळ येथील सरपंच शिवानी म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये उत्साही वातावरणात झाली.

महासंघाच्या वतीने जिल्हा परिषद परिचारिका संघटनेला शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद परिचारिका संघटनेच्या राज्याध्यक्ष मीनाक्षी मुदगल यांनी रायगड जिल्हा परिषद परिचारिका संघटना कार्यकारणी आणि उपस्थित एलएचवी व एएनएम यांचे कौतुक करून संघटनेला शुभेच्छा दिल्या. रायगड जिल्हा परिषद परिचारिका संघटनेच्या अध्यक्ष अनिता पाटील यांचा सत्कार राज्याध्यक्ष मीनाक्षी मुदगल यांनी केले.

सभेसाठी रायगड जिल्हा परिषद परिचारिका संघटना एनपीजी ३१३० अध्यक्ष अनिता पाटील, उपाध्यक्ष वनमाला पाटील, तृप्ती कोटकर, सचिव प्रियांका लांगी, सहसचिव मिनाज शिकलगार कार्याध्यक्ष शर्वरी टीवलेकर, दीपिका पाटील, कोषाध्यक्ष प्रणाली गावंड, संपदा घोसाळकर, संघटक अंजनी पाटील, सविता पाटील, अपर्णा मखर, सुविधा पाटील, सल्लागार आशा जाधव, मीडिया प्रमुख वैशाली बांदल यांनी सभेचे आयोजन उत्तमरित्या केले.


**सावधान नोटीस**

**दावा मिळकतीचे वर्णन**

**गाव-खानावळे, तालुका- पनवेल, जि. रायगड**

| गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| खानावळे | १ | १/ब | ०-२७-८० | ५.५८ |
| खानावळे | १३ | २/१ | १-४६-०० | १५.५० |
| खानावळे | १४ | – | ०-३४-९० | ५.५६ |
| खानावळे | १६ | १ | ०-४०-५० | ७.५८ |
| खानावळे | १६ | ३ | ०-४३-५० | ६.२८ |

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल मे. सॅफरॉन पार्क प्रोजेक्ट प्रा.लि. शेलटन सफायर, ४०६, ४०७ चौथा मजला सेक्टर १५, प्लॉट नं. १८/१९, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ नोंदणीकृत खाजगी आस्थापना तर्फे संचालक श्री. नरेंद्र मणीलाल बुटाला व श्री. प्रत्यक्ष नरेंद्र बुटाला यांनी पनवेल येथील मे दिवाणी न्यायाधीस वरिष्ठ स्तर साहेब यांचा कोर्टात स्पेशल दिवाणी मुकादमा दावा क्र.५८/२०२३ हा प्रतिवादी श्री. महादेव रामचंद्र पाटील राहणार खानावळे यांचे विरुध्द दिनांक ०३/०९/२०१२ रोजीच्या साठेकराराची विशेष पूर्तता करुन मिळण्याकरीता व निरंतर ताकदीकरीता ठरावा करिता नुकसान भरपाई करीता तद्नुषगिक मागण्या करीता वर नमूद भूखंडाबाबत ज्यास दिवाणी दाव्यामध्ये दावा भूखंड असे संबोधिले आहे. सदर दिवाणी दावा आज रोजी न्याय प्रविष्ठ आहे. सदर दाव्याच्या दावा मिळकतीचे वर्णन केलेल्या भूखंडाचे लीज पेंडन्सी हे सह. दुय्यम निबंधक पनवेल यांच्या कार्यालयात दस्त क्र पवल-४-१२३५३-२०१९ अन्वये दिनांक २३/१२/२०१९ रोजी नोंदणीकृत केलेले आहे.

सदर नोटीसद्वारे तमाम जनतेस असे सुचित करण्यात येते की, वर्णन केलेल्या दावा मिळकतबाबतचे कोणतेही व्यवहार हे माझ्या अशिलांच्या हक्कास व अधिकारास बाधा निर्माण करणे आणि त्यामुळे सदर मिळकती बाबतचे व्यवहार हे माननीय दिवाणी न्यायालय हे सदर दिवाणी दाव्यात जो हूकूमनामा पारित करतील त्याला अधीन राहून असतील म्हणून सदर दावा मिळकीबाबत कोणत्याही व्यवहार हा स्पेशल दिवाणी मुकादमा क्र. ५८/२०२३ च्या अधीन राहून असेल व सदर व्यवहाराची जोखीम हि संपूर्णतः दावा मिळकत खरेदी करण्याचा व्यक्तीची अथवा संस्थेची असेल आणि भविष्यात त्या व्यक्ती अथवा संस्थेस सदर दिवाणी दाव्यात पक्षकार केले जाईल आणि त्यातून होणाऱ्या संभाव्य परिणामास ती व्यक्ती अथवा संस्था स्वतः जबाबदार राहील याची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/०३/२०२५ रोजी.

**सही /-**
**ॲड. अदिती बाळकृष्णा पाटील**
**वकील उच्च न्यायालय**
यशोकिरण सोसायटी, गाळा नं.१०
लोखंडी पाडा, पनवेल, विर सावरकर
चौकाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड



**उरण नगरपरिषद**

**उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड. ४००७०२**

**जाहीर आवाहन**

**अंतिम सुचना**

या जाहीर आवाहनव्दारे उरण नगरपरिषद हद्दीतील सर्व मालमत्ताधारक / थकबाकीदार यांना कळविणेत येते कि, मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी कर थकबाकीसह कराची रक्कम नगरपरिषद कार्यालयात ३ दिवसाच्या आंत भरणा करुन नगरपरिषदेस सहकार्य करावे अन्यथा खालील प्रमाणे सक्तीची कारवाई प्रस्तावित करणेत येईल.

१- थकबाकीदारांची नावे वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेत येईल.
२- थकबाकीदारांच्या नावांची यादीचे बॅनर छपाई करुन शहरात विविध ठिकाणी नावे प्रसिध्द करणेत येतील.
३- थकबाकीदारांचे नळ कनेक्शन बंद करणेत येतील. तसेच सदर मालमत्तेचा कचरा संकलन बंद करणेत येवुन नगरपरिषदेकडुन पुरविणेत येणा-या सर्व सोईसुविधा बंद करणेत येतील.
४- थकबाकीदारांच्या नावांचा शहरात विविध ठिकाणी व मालमत्तेच्या ठिकाणी रिक्षाव्दारे पुकारा (दवंडी) देणेत येईल.
५- थकबाकीदारांच्या नावांचा मालमत्तेच्या ठिकाणी ढोल ताशे व बँन्ड वाजविणेत येईल.

तसेच अंतिमःता सदर थकबाकीदार मालमत्ता धारकांवर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५२ अन्वये अधिपत्र काढुन कलम १५२ (ब) नुसार मालमत्ता जप्तीची सक्त कारवाई प्रस्तावीत करणेत येईल याची नोंद घ्यावी.

तरी संबंधित मालमताधारक यांनी ३ दिवसाच्या आंत मालमत्ता कराचा तसेच पाणीपट्टी कराचा भरणा नगरपरिषद कार्यालयात करणेत येवुन पुढिल होणारी सक्तीची कारवाई टाळणेत यावी. व नगरपरिषदेस सहकार्य करावे. तसेच वसुली विभाग व पाणीपट्टी विभाग कार्यालयीन सुटीच्या चालु राहणार आहे. याची नोंद घ्यावी.

**जा.क्र. उनप/कर विभाग/७१०७/२०२४-२५**
**उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड. ४००७०२**
**दिनांक : १९/०३/२०२५**

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**उरण नगरपरिषद, उरण**

# मुंबईच्या पहिल्या सामन्यात सूर्या कर्णधार

**मुंबई : प्रतिनिधी**

बहुप्रतिक्षित आयपीएलचा १८वा सीझन येत्या २२ मार्चपासून सुरू होत आहे. याचबरोबर स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशीच आयपीएलमधील एल क्लासिको सामना म्हणजेच मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यात होणार आहे. हा दोन्ही संघांचा पहिला सामना असणार आहे, पण मुंबईच्या पहिल्याच सामन्यात संघाचा कर्णधार मैदानाबाहेर असेल. हार्दिक पांड्याच्या अनुपस्थितीत संघाचे नेतृत्व सूर्यकुमार यादव करणार आहे.



मुंबई इंडियन्स संघाची स्पर्धेपूर्वीची पत्रकार परिषद बुधवारी (दि. १९) झाली. या पत्रकार परिषदेसाठी मुंबईचा कर्णधार हार्दिक पांड्या आणि मुख्य प्रशिक्षक महेला जयवर्धने उपस्थित होते. यादरम्यान हार्दिकने अनेक प्रश्नांची उत्तरे दिली तसेच पहिल्या सामन्यात संघाचे नेतृत्व कोण करणार हेदेखील त्याने सांगितले.

आयपीएल २०२४मधील अखेरच्या सामन्यातील स्लो ओव्हर रेटमुळे मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्यावर एका सामन्याची बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे हार्दिक आयपीएल २०२५च्या पहिल्या सामन्यात खेळताना दिसणार नाही. त्यामुळे आता हार्दिकच्या जागी संघाचे नेतृत्व कोण करणार याकडे सर्वांच्या नजरा होत्या.

हार्दिक पांड्याने पत्रकार परिषदेत विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना सांगितले की, त्याच्या अनुपस्थितीत सूर्यकुमार यादव आयपीएल २०२५च्या पहिल्या सामन्यात मुंबई इंडियन्स संघाचे नेतृत्व करणार आहे. सूर्यकुमार भारतीय संघाचेही नेतृत्व करतो. त्यामुळे यंदाच्या पहिल्या आयपीएल सामन्यात मुंबई संघाचे नेतृत्व तोच करणार आहे.

### कर्णधारांचा संघ

मुंबई इंडियन्स संघाने आयपीएल २०२५च्या महालिलावापूर्वी संघातील मुख्य खेळाडूंना रिटेन केले, ज्यामध्ये जसप्रीत बुमराह, हार्दिक पांड्या, रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा यांच्या नावाचा समावेश आहे. या पाचही खेळाडूंनी भारतीय संघाचे कर्णधारपद भूषवले आहे. रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादव हे भारतीय संघाचे कर्णधार आहेत, तर हार्दिकने वनडे आणि टी-२०मध्ये संघाचे नेतृत्व केले आहे. याशिवाय तिलक वर्माने इमर्जिंग आशिया कप स्पर्धेत भारताचे नेतृत्व केले होते.

# खालापूरची कबड्डीपटू प्रियांका शिंदेची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

ठाणे येथे होणाऱ्या ७२व्या राज्यस्तरीय पुरुष श्रीकृष्ण करंडक व महिला स्व. पार्वतीबाई सांडव चषक कबड्डी स्पर्धेसाठी वावोशी (ता. खालापूर) गावची कन्या प्रियांका महादू शिंदे हिची रायगड महिला संघात निवड झाली आहे.



ठाणे (पश्चिम) येथील जे.के. केमिकल कंपनीच्या क्रीडांगणावर १९ ते २३ मार्चदरम्यान राज्य अजिंक्यपद निवड चाचणी मुख्यमंत्री चषक कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत प्रियांका ही रायगड महिला संघाकडून खेळत असून तिने आपल्या मेहनतीच्या जोरावर राज्यस्तरीय स्पर्धेत स्थान मिळवले आहे.

याबद्दल वावोशी गावासह छत्तीशी विभाग व खालापूर तालुक्यातील क्रीडाप्रेमींकडून प्रियांका शिंदेचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# आयसीसी टी-२० क्रमवारीत बाबर आझमला फटका

**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरारष्ट्रीय क्रिकेट परिषदेने नुकत्याच जाहीर केलेल्या टी-२० क्रमवारीत पाकिस्तानचा स्टार क्रिकेटर बाबर आझमला मोठा फटका बसला आहे. दुसरीकडे आयपीएलच्या तयारीत असलेल्या भारतीय क्रिकेटपटूंचा जलवा दिसतोय.

भारतात आयपीएलचा माहोल असताना पाकिस्तानचा संघ न्यूझीलंड दौऱ्यावर पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळत आहे. या मालिकेत बाबर आझमला संघात स्थान मिळालेले नाही. स्थान गमावल्याचा मोठा फटका त्याला आयसीसी क्रमवारीत झाल्याचे दिसते. तो आयसीसीच्या टी-२०तील फलंदाजांच्या क्रमवारीत ‘टॉप १०’मधून बाहेर पडण्याच्या उंबरठ्यावर आहे.

पाकिस्तानविरुद्धच्या टी-२० मालिकेतील सलग दोन विजयामुळे न्यूझीलंडच्या ताफ्यातील खेळाडूंना आयसीसी क्रमवारीत चांगला फायदा झाला आहे. आफ्रिदीची धुलाई करणारा टिम सिफर्ट २० स्थानंनी झेप घेत १३व्या स्थानावर आला आहे. दुसरीकडे पाकचा स्टार खेळाडू बाबर आझम आयसीसी टी-२० क्रमवारीत सातव्या स्थानावरुन आठव्या स्थानावर घसला आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या उर्वरित तीन टी-२० सामन्यानंतर बाबरवर ‘टॉप १०’मधून बाहेर पडण्याची वेळही येऊ शकते.

आयसीसी टी-२० क्रमवारीत ऑस्ट्रेलियाचा ट्रॅविस हेड ८५६ गुणांसह अव्वलस्थानावर आहे. त्याच्यापाठोपाठ या यादीत अभिषेक शर्माचा नंबर लागतो. त्याच्या खात्यात ८२९ गुण जमा आहेत. इंग्लंडचा फिल सॉल्ट ८१५ गुणांसह या यादीत तिसऱ्या स्थानावर असून त्यानंतर चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर तिलक वर्मा (८०४ रेटिंग पॉइंट्स) आणि सूर्यकुमार यादव (७३९ रेटिंग पॉइंट्स) यांचा नंबर लागतो.

# बुमराह लवकरच संघात दाखल होईल -जयवर्धने


**मुंबई : प्रतिनिधी**

यंदाच्या हंगामाच्या मोहिमेला सुरुवात करण्याआधी मुंबई इंडियन्स संघाचा कर्णधार हार्दिक पांड्या आणि संघाचे प्रशिक्षक महेला जयवर्धने यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. या वेळी प्रशिक्षक जयवर्धने यांनी बुमराहच्या अनुपस्थितीबद्दल माहिती दिली.

जयवर्धने म्हणाले की, जसप्रीत बुमराह हा सध्या बंगळुरूस्थित राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत आहे. त्याच्यात प्रगती दिसत असून तो लवकरात लवकर संघात दाखल होईल, अशी आशा आहे. तो क्रिकेट जगतातील सर्वोत्तम गोलंदाज आहे. त्यामुळे त्याच्या अनुपस्थितीत मैदानात उतरणे निश्चितच एक आव्हान असेल. त्याच्या अनुपस्थितीत अन्य खेळाडूसाठी एक संधी निर्माण होईल.

# लखनऊ संघाला धक्का!

## दुखापतीमुळे आकाश दीप सुरुवातीच्या सामन्यांना मुकणार?



**लखनऊ : वृत्तसंस्था**

आयपीएलचा नवा हंगाम सुरू होण्यासाठी अवघे तीन दिवस शिल्लक राहिले आहेत. पहिला सामना २२ मार्चपासून होणार आहे, पण त्याआधी अनेक संघांचे काही खेळाडू दुखापतग्रस्त होत असल्याच्या बातम्या येत आहेत. आता लखनौ सुपरजायंट्स संघाचा वेगवान गोलंदाज आकाश दीप दुखापतग्रस्त असल्याची माहिती आहे.

दुखापतींचा सर्वाधिक फटका लखनौ संघाला बसला आहे. मोहसिन खान आणि आवेश खान या दोघांच्या फिटनेसबाबत संघ चिंतेत आहे. त्यातच मयंक यादवदेखील दुखापतीमुळे हंगामातील सुरुवातीच्या सामन्यांना मुकण्याची शक्यता आहे. त्यानंतर आता दुखापतीमुळे आकाश दीप पहिल्या काही सामन्यांत उपलब्ध नसेल असे बोलले जात आहे.

रिपोर्टनुसार आकाश दीपची दुखापत गंभीर असून तो इतक्यात तंदुरूस्त होईल अशी शक्यता नाही. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेतील पाचव्या सामन्यात आकाश दीपला दुखापतीमुळे संघाबाहेर बसावे लागले होते, पण त्याची कामगिरी चांगली असल्याने त्याला लखनऊ संघाने यंदाच्या हंगामासाठी आठ कोटींची बोली लावून खरेदी केले. आता मात्र त्याच्याबद्दल मिळालेल्या माहितीनुसार त्याची दुखापत गंभीर आहे.

अशा परिस्थितीत लखनऊ संघाचे किती वेगवान गोलंदाज सध्या खेळण्यासाठी उपलब्ध आहेत याबाबत स्पष्टता देण्यात आलेल नाही. दरम्यान, भारतीय संघाचा अनुभवी यष्टीरक्षक ऋषभ पंत यंदा लखनऊ संघाचे कर्णधारपद भूषवणार आहे. गेल्या वर्षापर्यंत पंत हा दिल्लीचा कर्णधार होता.

# आयपीएलसाठी महेंद्रसिंह धोनीचा जोरदार सराव

**चेन्नई : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी आपल्या दमदार फटकेबाजीने कायम चर्चेत असतो. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होण्याआधी धोनीची ओळख टीम इंडियाचा सर्वोत्तम मॅच फिनिशर अशी होती. धोनी कोविड काळात निवृत्त झाला, पण आयपीएलमध्ये तो अजूनही आपली फटकेबाजी दाखवून देत आहे.





१० महिने क्रिकेटपासून दूर राहणे आणि नंतर अचानक दोन महिने सलग क्रिकेट खेळणे ही गोष्ट कठीण आहे, पण धोनी ही गोष्ट गेली तीन-चार वर्ष करतो आहे. यंदाच्या आयपीएलला अवघे तीन दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे सर्वच संघ दमदार तयारी करत आहेत. चेन्नई सुपर किंग्ज संघानेदेखील आपसात एक सामना खेळला. त्या वेळी धोनीने आपल्या लोकप्रिय हेलिकॉप्टर शॉटची झलक दाखवली.

सीएसके संघाकडून धोनीचा हा शेवटचा हंगाम आहे अशा चर्चा पुन्हा एकदा सुरू झाल्या आहेत. गेल्या दोन-तीन वर्षांपासून धोनीबाबत या चर्चा ऐकू येत आहेत, पण धोनी मात्र दरवर्षी त्याच जोशाने आणि नव्या दमाने मैदानात उतरतो आणि साऱ्यांना थक्क करतो. यंदाही धोनीने सराव सामन्यात दमदार फटकेबाजी केली. श्रीलंकेचा युवा वेगवान गोलंदाज मथिशा पाथिराना गोलंदाजी करत होता. लसिथ मलिंगासारखी शैली असलेल्या पाथिरानाने गोलंदाजी करताना यॉर्कर चेंडू टाकला. धोनीला त्या यॉर्करचा काहीच फरक पडला नाही. धोनी हेलिकॉप्टर शॉट लगावत आलेला चेंडू त्याच वेगाने टोलवला आणि सीमारेषेपार पाठवला. धोनीच्या हेलिकॉप्टर शॉटचा व्हिडीओ व्हायरल झालाय.

# दिल्लीत आलेले न्यूझीलंडचे पंतप्रधान चक्क ‘गल्ली क्रिकेट’मध्ये रमले!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडचे पंतप्रधान क्रिस्टोफर लुक्सन सध्या भारत दौऱ्यावर आहेत. या दरम्यान त्यांनी एक खास फोटो शेअर करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. दिल्लीच्या रस्त्यावर लहान मुलांनी मांडलेल्या गल्ली क्रिकेटच्या खेळात सहभागी होऊन न्यूझीलंडच्या पंतप्रधानांनी या लोकप्रिय खेळाचा आनंद घेतल्याचे पहायला मिळाले.



न्यूझीलंडच्या पंतप्रधानांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून दोन फोटो शेअर केले आहेत. यात ते लहान मुलांसोबत क्रिकेटचा आनंद घेताना दिसते. मातीच्या विटासह तयार केलेले स्टंप आणि रस्त्यावरील डांबरी पिचवर त्यांनी बच्चेकंपनीसोबत टेनिस बॉलवर रंगलेल्या क्रिकेटच्या खेळाचा आनंद घेतला. क्रिकेटवरील अफाट प्रेम हा भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील समानतेचा एक धागाच आहे, अशा आशयाच्या कॅप्शनसह न्यूझीलंडच्या पंतप्रधानांनी हे फोटो शेअर केले आहेत.

न्यूझीलंडच्या पंतप्रधानांनी जो दुसरा फोटो शेअर केलाय त्यात न्यूझीलंडचा माजी क्रिकेटर रोस टेलरची झलक दिसते. हा दिग्गज फलंदाजीला आल्यावर क्रिस्टोफर लुक्सन मातीच्या विकेटमागे (स्टंप) क्षेत्ररक्षण करताना दिसले. सोशल मीडियावर हे फोटो चांगलेच व्हायरल होताना दिसत आहेत.

# राजस्थान रॉयल्सने कमी पैशांत केली चांगली संघबांधणी

**जयपूर : वृत्तसंस्था**

संजू सॅमसनच्या नेतृत्वाखाली राजस्थान रॉयल्सने सातत्याने चांगली कामगिरी केली आहे. संघाने संघातील सहा खेळाडूंना रिटेन केले आणि ४१ कोटींची सर्वात कमी पर्ससह लिलावात उतरले होते आणि तरीही त्यांनी चांगली संघबांधणी केली.




राजस्थानने वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरला ताफ्यात समाविष्ट केले आहे. जोफ्रा याआधीही राजस्थानकडून खेळला आहे. त्याच्या सहभागाविषयी अनिश्चितता होती, मात्र लिलावाच्या आधी काही तास जोफ्राला इंग्लंड क्रिकेट बोर्डाकडून हिरवा कंदील मिळाला आणि त्याचे नाव समाविष्ट करण्यात आले. राजस्थानने प्रमुख गोलंदाजांना सोडले होते. त्यामुळे आर्चरच्या रूपात त्यांनी मोठे नाव संघात सहभागी केले आहे. राजस्थानने आर्चरव्यतिरिक्त वानिंदू हासारंगा आणि महिश तीक्षणा या श्रीलंकेच्या फिरकीपटूंना संघात घेतले, तर कुमार कार्तिकेय या फिरकीपटूला मुंबईच्या ताफ्यातून आपल्याकडे आणले.

आयपीएल २०२५साठी राजस्थान रॉयल्सने कायम ठेवलेल्या सहा खेळाडूंच्या यादीने सर्वांना आश्चर्यचकित केले, ज्यामध्ये आर अश्विन, जोस बटलर आणि युझवेंद्र चहलसारख्या दिग्गजांची नावे नव्हती. राजस्थानने प्रथम कर्णधार संजू सॅमसनला संघात कायम ठेवले आहे. कर्णधार संजूशिवाय राजस्थानने यशस्वी जैस्वालला संघात कायम ठेवले आहे. रियान पराग, ध्रुव जुरेल हेही संघात कायम आहेत.

वेस्ट इंडिजचा स्फोटक फलंदाज शिमरॉन हेटमायरलाही राजस्थान संघाने कायम ठेवले आहे. मोठी गोष्ट म्हणजे संदीप शर्मालाही आपल्याकडे राखले आहे. याशिवाय आयपीएलमध्ये पहिल्यांदाच आलेला १३ वर्षीय भारतीय खेळाडू वैभव सूर्यवंशी याला राजस्थान संघाने एक कोटी रूपये खर्चून संघात दाखल केले आहे. त्याची लिलावातील मूळ किंमत ३० लाख होती.

# टी-२० सामने हरण्यामध्ये पाकचे ‘शतक’

**ड्युनेडिन : वृत्तसंस्था**

पाकिस्तानी संघ सध्या फारच बिकट परिस्थितीत आहे. क्रिकेटचा कुठलाही फॉरमॅट असो पाकिसतानी संघाच्या पदरी निराशाच येताना दिसतेय. तशातच आता पाकिस्तानी संघाने एक नकोसा विक्रम केला असून त्यांची तुलना थेट झिम्बाब्वेसारख्या कमकुवत संघाशी केली जात आहे.

वनडे वर्ल्डकप, टी-२० वर्ल्डकप आणि चॅम्पियन्स ट्रॉफी तिनही बड्या स्पर्धांमध्ये पाकिस्तानी संघाला साखळी फेरीतच गाशा गुंडाळावा लागला. मध्यंतरीच्या काळात अमेरिकासारख्या नवख्या संघानेही पाकिस्तानला पराभूत केले. नुकताच पाकिस्तानी संघाने अतिशय लाजिरवाणा विक्रम आपल्या नावे केला आहे. १०० टी-२० आंतरराष्ट्रीय सामने हरणारा पाकिस्तान हा जगातील पाचवा संघ बनला आहे. आतापर्यंत या यादीत वेस्ट इंडिज, श्रीलंका, झिम्बाब्वे आणि बांगलादेश या संघांचा समावेश होता, मात्र आता पाकिस्तानचा संघही या पंक्तीत जाऊन बसला आहे. १८ मार्चला झालेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यात न्यूझीलंडने पाकिस्तानचा पराभव केला. त्यानंतर पाकिस्तानचा या यादीत समावेश झाला.

# श्रद्धांजली चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत पेणचा संघ विजेता



**अलिबाग : प्रतिनिधी**

पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर आयोजित श्रद्धांजली चषक टी-२० लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत पेण स्पोर्ट्स असोसिएशन संघाने अंतिम विजयी होण्याचा मान मिळवला आहे. अटीतटीच्या अंतिम सामन्यात त्यांनी दिशा क्रिकेट अकॅडमी रोहा संघाचा तीन धावांनी पराभव करून स्पर्धेचे प्रथम पारितोषिक ५० हजार रुपये आणि आकर्षक चषक जिंकला.

प्रथम फलंदाजी करताना पेण संघाने २० षटकांमध्ये सात गडी गमावत १५९ धावा फलकावर नोंदवल्या. यामध्ये योगेश पवार याने सर्वाधिक ४३ आणि त्या खालोखाल प्रतिक म्हात्रेने ३० धावांचे योगदान दिले. रोहा संघाकडून तेजस मोहिते याने चार फलंदाज बाद केले.

लक्ष्याचा पाठलाग करताना रोहा संघाकडून आयुष माळी ३४ व सुमित म्हात्रे याने ३७ धावा केल्या. शेवटच्या षटकात रोहा संघाला जिंकण्यासाठी सात धावांची गरज असताना पेणच्या कौस्तुभ म्हात्रे याने अवघ्या तीन धावा दिल्या. रोहा संघाने आठ गडी गमावून १५६ धावा केल्या आणि पेण संघाने सामना तीन धावांनी जिंकला. पेण संघाकडून कौस्तुभ म्हात्रे, अभिषेक खातू, देवांश तांडेल आणि रमाकांत शर्मा यांनी रोह्याचे प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले.

बक्षिस वितरण समारंभास रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, पेण स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष अरुण शिंदे, उद्योजक राजू पिचिका, अतुल वनगे, आरडीसीएचे खजिनदार प्रशांत ओक, शाम पाटील, देवा पाटील, भाई देशपांडे, रवी तांडेल, दिनेश सावंत, मनोज कुलकर्णी, भूषण मोरे, विवेक ठाकूर, प्रदीप पाटील, मनोहर अहिर, प्रसाद पवार, रवी साळवी, प्रवीण आंद्रे, सुरेंद्र भातिकरे, सागर बोबड, शेखर भगत यांच्यासह खेळाडू व क्रिकेटप्रेमी लोकं मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com